https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026



❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २१४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.२४ सप्टेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## राज्यात अतिवृष्टीने नुकसानग्रस्त १९ लाख शेतकऱ्यांना १३३९ कोटींची मदत

### अमरावती जिल्ह्याला १०८ कोटी ७१लाख रुपयांची मदत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मुंबई**

राज्यात जुलै व ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे नुकसान झालेल्या वीस जिल्ह्यांतील १९ लाख २२ हजार ९०९ शेतकऱ्यांना १३३९ कोटी ४९ लाख रुपयांच्या मदतीला शासनाने मान्यता दिली आहे. तातडीने हा निधी संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात येणार आहे.

राज्यात यंदा मान्सूनपूर्व सह मान्सूनमधील पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. विशेषत: मराठवाडा, विदर्भातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीचा मोठा फटका बसला असून, यामध्ये खरीप पिके उद्ध्वस्त झाली आहेत. हातातोंडाला आलेली पिके वाहून गेल्याने शेतकरी उघड्यावर पडला आहे. या नुकसानीचे पंचनामे पूर्ण झाले असून, त्यांना तत्काळ मदत देण्यासाठी राज्य सरकारने पाऊल उचलले आहे.राज्यात १९ लाख २२ हजार ९०९ शेतकऱ्यांचे तब्बल १५ लाख ४५ हजार २५० हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. या क्षेत्राला शासकीय नियमानुसार १३३९ कोटी ४९ लाख रुपये मदत दिली असून, त्याला शासनाने मान्यता दिली आहे.दरम्यान, चार दिवसांपूर्वीच नांदेड, परभणी, सातारा व सांगली जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना ६८९.५२ कोटी रुपयांच्या मदतीला सरकारने मान्यता दिली आहे.

**हंगामात एकच वेळी मदत मिळणार**

यंदा मे महिन्यात अनेक जिल्ह्यात मान्सून पूर्व पावसाने झोडपून काढले होते. त्याचे पंचनामे पूर्ण झाले आहेत. तेही शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत आहेत. एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे मदत दिली, याची खात्री करण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनावर सोपवली आहे.


### जिल्हानिहाय अशी मिळणार मदत

| जिल्हा | शेतकरी | बाधित क्षेत्र (हेक्टर) | मदत निधी (कोटीत) |
|---|---|---|---|
| अमरावती | १,६८,५३३ | १,२३,७६३ | १०८.७१ |
| अकोला | ११,५९७ | ७,३१० | ६.२१ |
| यवतमाळ | २,२६,६५२ | २,१०,८४५ | १८३.४२ |
| बुलढाणा | १,८०,३६८ | १,४३,३८९ | १२१.८९ |
| वाशिम | २,०१,८२४ | १,६९,२८४ | १४५.३५ |
| गोंदिया | ३५६ | २५८ | ०.२३ |
| भंडारा | ८,२८३ | २,५८९ | ४.३३ |
| गडचिरोली | १८,३०७ | १०,९११ | १२.८९ |
| वर्धा | ९,१०७ | ६,३८० | ५.४२ |
| नागपूर | १,५७८ | १,०८३ | ०.९६ |
| कोल्हापूर | ३६,५५९ | ८,८३५ | १४.२८ |
| हिंगोली | ३,०४,८२९ | २,७१,५८६ | २३१.२७ |
| बीड | १,१४,७७३ | ६६,७३१ | ५६.७३ |
| लातूर | ३,८०,५११ | २,८७,१५१ | २४४.३५ |
| धाराशिव | २,३४,९५५ | २,२२,९७५ | १८९.६० |
| नाशिक | ७,१०८ | ४,०१४ | ३.८१ |
| धुळे | ७२ | २३ | ०.०२ |
| नंदुरबार | २५ | ११ | ०.०१ |
| जळगाव | १७,३३२ | ८,०२७ | ९.८६ |
| आहिल्यानगर | १४० | ७१ | ०.०६ |

## पूरग्रस्तांच्या मदतीसाठी शेताच्या बांधावरुन मुख्यमंत्री फडणवीस यांची मोठी घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४माढा**

काल आम्ही जवळपास २ हजार कोटी रिलीज केले. शेतकऱ्यांना मदत करणारच आहोत, पण त्यासोबत ज्यांच्या घराचं नकुसान झालेलं आहे. अन्नधान्याच नुकसान झालय, त्यांनाही मदत करणार आहोत. शासनाने हा निर्णय केलेला आहे की, कुठलेही अधिकचे निकष न लावता आवश्यकतेनुसार निकष शिथिल करुन नागरिक केंद्रीत मदत करायची आहे. नियमांवर बोट न ठेवता नागरिकांना, शेतकऱ्यांना, शेत मुजरांना मदत होईल अशा पद्धतीने मदत करण्याचे निर्देश दिले आहेत असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज माढ्यामध्ये येऊन नुकसानीची पाहणी केली.



आपत्ती सुरु असताना पैसा रिलीज करणं सुरु केलेलंआहे. दिवाळीपूर्वी आम्ही सर्वांना मदत करणार आहोत' असं आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिलं. ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होत आहे, त्यावर फडणवीस म्हणाले की, ओला दुष्काळ बोली भाषेतली टर्म आहे. पावसामुळे जे नुकसान झालय त्या सर्वाची नुकसानभरपाई, टंचाईस्थितीत शेतकऱ्यांना ज्या सवलती दिल्या जातात, त्या सर्व सवलती देण्याचा निर्णय आम्ही घेतलाय असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

## सरकार उतरले शेतकऱ्यांच्या बांधावर

### सोलापूरला महापूर; मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्र्यांसह सहा मंत्री आज सोलापूर दौऱ्यावर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४सोलापूर**

अहिल्यानगर व धाराशिव जिल्ह्यांत झालेल्या अतिवृष्टीमुळे सीना कोळेगाव, चांदणी, खासापुरी प्रकल्प तसेच भोगावती नदीमधून सीना नदीमध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. परिणामी सीना नदीकाठावरील गावांमध्ये पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून पुराचा धोका निर्माण झाला आहे. १२९ गावांना पाण्याने वेढा घातला आहे.

यासंदर्भातील पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाट, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीष महाजन, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह राज्यातील वरिष्ठ अधिकारी सध्या सोलापूर जिल्ह्यातील माढा, करमाळा, बार्शी, मोहोळ, मंगळवेढा भागातील पूरग्रस्त भागांची पाहणी करीत आहेत. मुख्यमंत्र्यांनी सकाळपासूनच माढा, करमाळा तालुक्यात पाहणी दौरा केला. अजित पवार यांनी करमाळा तालुक्यात तर एकनाथ शिंदे हे दुपारनंतर सोलापूर भागातील पाहणी करणार आहेत. गिरीष महाजन यांनी काल रात्रीपासून बार्शी तालुक्यात पाहणी दौरा करीत आहेत. एनडीआरएफ व भारतीय सैन्याची टीम बचाव कार्य करीत आहे. पुराने व्यापलेल्या गावातील लोकांना सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात येत आहे. शेतीपिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याने आता शेतकरी ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी मंत्र्यांसमोर करीत आहेत.

## राज्यातील रस्ते खड्डेमुक्त होणार, १२९६ कोटींचा निधी मंजूर; मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४सातारा**

सलग पाच महिन्यांत पडलेल्या धुवाधार पावसाने राज्यातील अनेक रस्त्यांची स्थिती खराब झाली आहे. या रस्त्यांची तातडीने देखभाल व दुरुस्तीची गरज आहे. त्यामुळे राज्य शासनाने रस्त्यांच्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत २०२५-२६ वर्षासाठी १ हजार २९६ कोटींच्या निधीस मंजुरी दिली आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्रीशिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली.

या निधीच्या मंजुरीमुळे तातडीची दुरुस्तीची कामे तर होणारच आहेत, याशिवाय अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कामांमध्ये पारदर्शकता आणली जाणार आहे. तसेच वृक्षारोपण व संवर्धन मोहिमेमुळे पर्यावरणपूरक विकासाला चालना मिळेल. खड्डेमुक्त, सुरक्षित आणि टिकाऊ रस्ते उपलब्ध होतील. प्रवासाचा वेळ, इंधनाची बचत आणि अपघातांची शक्यता कमी होईल. रस्त्यांच्या आजूबाजूला



हरित पट्टा तयार होऊन पर्यावरण संतुलनही राखले जाईल, असे शिवेंद्रसिंहराजे यांनी सांगितले.

ते म्हणाले, रस्त्यांवरील खड्डे भरणे, तातडीची दुरुस्ती, पावसामुळे बाधित मार्गांची दुरुस्ती, तसेच पूरक कामे हाती घेण्यासाठी ही रक्कम उपयोगात आणली जाणार आहे. तर ४३ हजार किलोमीटर रस्त्यांवरील खड्डे टप्प्याटप्प्याने भरले जातील. यामुळे नागरिकांना सुस्थितीतील रस्त्यांवरून सुरक्षित प्रवास करणे सोयीस्कर होईल, असेही मंत्री शिवेंद्रसिंहराजेंनी स्पष्ट केले.

राज्यातील एकूण आठ प्रादेशिक विभागांतर्गत येणाऱ्या सर्व जिल्ह्यांमधील रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येणार आहे. कामांची गुणवत्ता तपासणे आणि मानकांचे पालन होणे, यावरही काटेकोरपणे लक्ष ठेवणार आहे. रस्त्यांची दुरुस्ती वेळेत व दर्जेदार होण्यासाठी शासनाने तंत्रज्ञानाचा आधार घेतला आहे. प्रायोगिक तत्त्वावर एआय आधारित प विकसित करण्यात आले. याच्या मदतीने रस्त्यांवरील खड्ड्यांचे स्थान, दुरुस्तीची स्थिती तसेच कामांची वास्तविक वेळेत तपासणी करणे शक्य होणार आहे. अशी माहिती शिवेंद्रसिंहराजे भोसले, सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दिली.

## शेतकऱ्यांच्या मदतीसाठी नवा मार्ग, आता लवकरच........ अजित पवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३सोलापूर**

गेल्या काही दिवसांपासून राज्यात काही ठिकाणी मुसळधार पाऊस झाला आहे. मराठवाड्याच्या काही भागात या पावासाचा जोरदार फटका बसला आहे. शेतकऱ्यांच्या शेतातील उभे पीक पुराच्या पाण्यात वाहून गेले आहे. लोकांचे घर, घरातील वस्तू पाण्यात वाहून गेले आहेत. या पावसामुळे हाता-तोंडाशी आलेली खरीप हंगामातील पिकं वाहून गेली आहेत. दरम्यान, याच नुकसानीची पाहणी करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यंत्री मराठवाडच्याच्या दौऱ्यावर आहेत. या



दौऱ्यादरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी टीव्ही ९ मराठीला महत्त्वाची माहिती दिली आहे. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून आम्ही केंद्र सरकारकडे मदतीची मागणी करणार आहोत, असे अजित पवार यांनी सांगितले आहे. तसेच ओल्या दुष्काळासंदर्भातही त्यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

सरकारने ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी विरोधकांकडून केली जात आहे. त्यामुळे सरकार याबाबत काही निर्णय घेणार का? असे विचारले असता, आम्ही पण विरोधी पक्षात होतो. विरोधक अशा मागण्या करतात. पण सत्तेत असताना तुम्हाला अशा घटनांमुधून मार्ग काढावे लागतात. आज राज्य सरकारचे जे नियम आहेत, ते नियम बाजूला ठेवण्याची आमची तयारी आहे. शेतकऱ्यांची मदत करण्याच्या दृष्टीकोनातून आम्ही काय-काय करता येईल यात आम्ही कुठेही कमी पडणार नाहीत, असे सांगत अजित पवार यांनी ओला दुष्काळ जाहीर करण्याची शक्यता फेटाळून लावली. तसेच आम्ही नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली आहे. या पाहणीतून आम्हाला अंदाज आला आहे. या नुकसानीची माहिती आम्ही केंद्र सरकारलाही देणार आहोत. केंद्र सरकारनेही आम्हाला भरीव मदत करावी, असी मागणी आम्ही करणार असल्याचेही अजित पवार यांनी सांगितले.

## नंदुरबारमध्ये मूक मोर्चाला हिंसक वळणवाहनांची तोडफोड, दगडफेक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नंदुरबार :१३**

शहरात दोन युवकांमध्ये झालेल्या हाणामारीत गंभीर जखमी जय वळवी या तरुणाचा १७ सप्टेंबर रोजी मृत्यू झाला होता. या हत्येच्या निषेधार्थ बुधवारी नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालयावर आदिवासी संघटनांच्या वतीने काढण्यात आलेल्या मूक मोर्चाला हिंसक वळण लागले. जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आल्यानंतर काही उपद्रव्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासह परिसरातील इतर शासकीय आवारांमध्ये उभ्या असलेल्या आठ ते १० वाहनांची तोडफोड केली.

काही वाहने उलटविण्यात आली. काही वाहनांची जाळपोळ करण्यात आली. पोलिसांनी जमावाला पांगविण्यासाठी सौम्य लाठीमार केला. अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. त्यानंतर जमावातील उपद्रवी इतरत्र पळाले. सध्या नंदुरबारमध्ये तणाव असून पोलीस परिस्थितीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. दगडफेकीत प्राथमिक माहितीनुसार पोलीस निरीक्षकासह तीन जण जखमी आहेत.

## फोटो लावून मदत करतात या आरोपावर एकनाथ शिंदेंचं रोखठोक उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४कारंजा**

शिवसेनेचे पक्ष प्रमुख आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शेतकऱ्याच्या मदतीसाठी थेट बांधावर पोहोचले आहेत. ५० ट्रक भरुन जीवनावश्यक साहित्याच वाटपं एकनाथ शिंदे यांनी केलं.कारंजा गावात त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. कारंजा गावात आपण आहोत. परंडा तालुक्यात खूप मोठ नकसान झालेलं आहे. यात प्रचंड शेतीच नुकसान झालय. घरात पाणी शिरल्यामुळे जीवनावश्यक वस्तूच नुकसान झालेलं आहे. म्हणून आता नदीकाठी जी गाव आहेत, गावातील जमिनी खरडून गेल्या आहेत. एकंदरीत प्रचंड मोठं नुकसान झालं



आहे. ९८ हजार हेक्टर शेतीच नुकसान झालेलं आहे. हे असमानी संकट आहे असं एकनाथ शिंदे म्हणाले. शेतकऱ्याच्या मागे उभं राहणं हे सरकारच काम आहे. सरकार यापूर्वी सुद्धा शेतकऱ्याच्या मागे उभ राहिलय,आजही उभं आहेत. जी काही तातडीची मदत आहे ती आधी केली जाईल. नंतर पाऊस पाणी कमी झाल्यावर पंचनामे करून जी काही मदत आहे, ती दिली जाईल असं एकनाथ शिंदे म्हणाले.


तातडीची मदत तात्काळ देऊ. नंतर पंचनामे करून जी मदत ठरवलीय ती देऊ. कारण नुकसान मोठं आहे. अटी शिथिल कराव्या लागतील. शेतकऱ्याच्या मागे उभं रहावं लागेल असं एकनाथ शिंदे म्हणाले. अशा काळात राजकारण करणं दुर्दैव आहे. मदत होणं आवश्यक आहे. सिंगल कपड्यावर लोक बाहेर आहेत. त्यांना कपडे देणं, जीवनावश्यक वस्तू, धान्य, रेशन भांडी देण्याच काम आपलं कर्तव्य आहे. यात कोणी राजकारण आणू नये. सध्याच्या स्थितीत जेवढी मदत करता येईल, तेवढी केली पाहिजे. आसमानी संकट आहे. राजकारण बाजूला ठेऊन मदत केली पाहिजे असं एकनाथ शिंदे म्हणाले.

## बॉम्बच्या धमकीनं नागपुरात खळबळ

### अटक केली म्हणून पोलीस स्टेशन उडवण्याची धमकी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नागपूर**

पोलीस हेल्पलाइन नंबर ११२वर पोलीस स्टेशन आणि पोलीस वसाहत उडवून देण्याची धमकी आली. बॉम्बने उडवून देण्याच्या धमकी आल्यानंतर खळबळ माजली होती. धमकीच्या कॉल आल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत धमकी देणाऱ्याला एकाला काटोल पोलिसांनी अटक केलीय. चेतन रामदास बानाईत, असं अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



जिल्ह्यातील काटोल पोलीस स्टेशन तसेच नागपूर ग्रामीण पोलीस वसाहत बॉम्बने उडवून देण्याची धमकी दिली होती. आरोपीची चौकशी केल्यानंतर त्याने धक्कादायक खुलासा केला. चेतनने मंगळवारी रात्री पोलीस हेल्पलाइन नंबर ११२ वर दोनदा कॉल केला. दोन्ही फोन कॉलवर त्याने वेगवेगळी धमकी दिली.

पहिल्या फोन कॉलवर त्याने काटोल पोलीस स्टेशन उडवून देण्याची धमकी दिली. तर दुसऱ्या फोनवर नागपूर ग्रामीण पोलीस वसाहत बॉम्बने उडून देण्याची धमकी दिली होती. त्यानंतर काटोल पोलिसांनी लागलीच त्याचा शोध घेत त्याला ताब्यात घेतलं.

## संपादकीय ......

# पंतप्रधान मोदी यांचे आरोग्यसेवेला बळ!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारताचे आरोग्यसेवा धोरण हे कल्याणाच्या संकुचित कक्षा ओलांडून पुढे गेले आहे. ते आता २०४७ पर्यंत विकसित भारत उभारण्याच्या रणनीतीच्या केंद्रस्थानी आहे. आरोग्याला गुंतवणूक मानून या उपक्रमांनी दाखवून दिले आहे की, आरोग्यसेवेतील सुशासनही एक उत्तम आर्थिक धोरण आहे. ते आजारांचा भार कमी करते, कौटुंबिक बचतीचे रक्षण करते आणि मानवी भांडवल खुले करते.

गुजरातचे मुख्यमंत्री होते तेव्हापासूनच पंतप्रधान मोदी यांना आरोग्यसेवेत रस होता. त्यावेळी त्यांनी वेळेवर उपाययोजना आणि सुगम्य सेवांवर भर दिला. १०८ आपत्कालीन रुग्णवाहिका सेवेमुळे ग्रामीण आणि शहरी समुदायांना जलद वैद्यकीय मदत मिळाली, ज्यामुळे मृत्यू दर कमी झाला तसेच आजारांचे प्रमाण कमी झाले. त्याच वेळी आदिवासी आणि ग्रामीण भागातील मुलांसाठी राबवत असलेल्या पोषण या पोषणविषयक कार्यक्रमाने सूक्ष्म पोषक तत्त्वांची कमतरता दूर केली आणि यातून चांगल्या शैक्षणिक निकालांचा पाया रचला गेला. या सुरुवातीच्या प्रयोगांनी राष्ट्रीय सुधारणांना आकार देणारे तत्त्व सर्वांसमोर आणले. प्रतिबंधात्मक उपाययोजनांमधील गुंतवणूक उत्पादकता आणि समृद्धीमध्ये लाभ मिळवून देते. राष्ट्रीय नेतृत्व स्वीकारल्यानंतर मोदी यांनी या धड्यांचा अभूतपूर्व पोहोच असलेल्या कार्यक्रमांपर्यंत विस्तार केला. २०१८ मध्ये सुरू केलेली आयुष्मान भारत ही जगातील सर्वात मोठी सरकार पुरस्कृत आरोग्य विमा योजना बनली, जी ५५ कोटींहून अधिक आर्थिकदृष्ट्या कमकुवत नागरिकांना उपचार पुरवते. कुटुंबांचे भल्यामोठ्या वैद्यकीय खर्चापासून संरक्षण करून लाखो लोकांना आजारपणानंतर पुन्हा गरिबीत जाण्यापासून रोखण्यास या योजनेने मदत केली आहे. ही योजना रुग्णांना पॅनेलशी संलग्न रुग्णालयांमध्ये उपचार मिळवून देते, दर्जात्मक सुधारणांना प्रोत्साहन देते आणि दुय्यम आणि तृतीयक आरोग्यसेवांमध्ये स्पर्धात्मक व्यवस्थेला चालना देते.

२०१८ मध्ये सुरू झालेल्या पोषण अभियानाचा उद्देश गर्भवती, स्तनपान देणार्या माता आणि लहान बालकांमधील कुपोषणाची समस्या दूर करणे आहे. पूरक पोषण, वाढीचे निरीक्षण आणि वर्तणुकीत बदल अभियान एकत्रितपणे निरोगी माता आणि सुदृढ बाळांची काळजी घेते. लहान वयात चांगले पोषण मिळाल्यामुळे संज्ञानात्मक विकास आणि भविष्यातील कमाई क्षमता वाढवते. अनेक दशके उच्च उत्पादकतेत मोजमाप करता येऊ शकेल, असा हा गुंतवणुकीवरील परतावा आहे .

जनऔषधी केंद्रांमुळे औषधांच्या परवडणार्या किमतींना मोठी चालना मिळाली आहे. १६,९०० हून अधिक जनऔषधी केंद्रे मोठ्या सवलतीच्या दरात दर्जेदार जेनेरिक औषधे पुरवत असल्यामुळे कुटुंबांना महागड्या ब-ँडेड औषधांवर खर्च करावे लागणारे पैसे आता ते अन्न, शिक्षण किंवा छोट्या व्यवसायातील गुंतवणुकीसाठी वळवू शकतात. स्वच्छ भारत मिशनचा बहुतेक वेळेस स्वच्छता मोहीम या चौकटीत समावेश केला जात असला, तरी ती सार्वजनिक आरोग्य क्रांती आहे. शहरे आणि खेड्यांमध्ये बांधलेल्या लाखो स्वच्छतागृहांमुळे उघड्यावरील शौचाचे प्रमाण झपाट्याने कमी झाल्याने जलजन्य रोगांच्या संसर्गाचे प्रमाण कमी होऊन दरवर्षाला ६०,०००-७०,००० अर्भकांचे प्राण वाचल्याचा अंदाज आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'सारख्या महिलाकेंद्रित उपक्रमांनी लिंग गुणोत्तरात सुधारणा झाली असून मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळाले असताना दुसरीकडे डिजिटल आरोग्य साधने आणि आयुष्मान भारत आरोग्य केंद्रांमुळे अगदी लहानातल्या लहान वस्त्यांनाही वैद्यकीय तपासणी, दूरस्थ पद्धतीने वैद्यकीय सल्ला आणि इलेक्ट्रॉनिक आरोग्य नोंदी अशा सोयी उपलब्ध होत आहेत. या सर्व गोष्टींचा एकत्रित परिणाम म्हणजे, या उपाययोजनांमुळे मोठ्या संख्येने निरोगी नागरिक, डिस्पोजेबल उत्पन्न टिकवून ठेवणार्या कुटुंबांची परिसंस्था निर्माण झाली आहे. त्याचसोबत कार्यबल अधिक विश्वासार्ह आणि कुशल होत आहे.युनिसेफच्या माहितीनुसार, स्वच्छ भारत मिशन चळवळीमुळे प्रत्येक ग्रामीण कुटुंबाची दर वर्षाला सुमारे ५०,००० रुपयांची बचत झाली. या सुधारणांमागील आर्थिक तर्क लक्षवेधक आहे. भारताला पूर्वीपासून खिशाला न परवडणार्या आरोग्यसेवेच्या खर्चाच्या समस्येचा सामना करावा लागत होता. २०१३-१४ मध्ये अशा एकूण खर्चात त्याचे प्रमाण ६४ टक्के होते. २०२१-२२ पर्यंत हे प्रमाण ३९ टक्क्यांपर्यंत कमी झाले. यासाठी मुख्यतः विस्तारित विमा, अनुदानित दराने पुरविली जाणारी औषधे आणि स्वच्छतेतील सुधारणा हे घटक कारणीभूत असल्याचे म्हणता येऊ शकते. आजारपणावर होणारा वैयक्तिक खर्च कमी झाल्याचे पर्यावसान कुटुंबांचे उपभोगाचे प्रमाण वाढण्यात, अधिक बचत आणि औपचारिक वित्तपुरवठ्यातील मजबूत सहभागाच्या रूपात होते.समानता आणि आर्थिक गतिमानता साध्य करण्यासाठी सरकार कशाप्रकारे सार्वजनिक धोरणाचा योग्य वापर करू शकते, हे भारताच्या आरोग्य क्षेत्रात २०१४ पासून झालेल्या परिवर्तनातून दिसून येते. आरोग्यसेवेला उत्पादकतेचा आधारस्तंभ म्हणून पुनर्स्थापित करून मोदी यांनी धर्मादायतेकडून गुंतवणुकीकडे असा मोठा बदल घडवून आणला. एकेकाळी आजारपण आणि कर्जाच्या विळख्यात अडकलेली कुटुंबे आता उत्पन्नाचा भाग राखून मुलांना शिक्षण देत आहेत आणि औपचारिक बाजारपेठेत योगदान देत आहेत.

आरोग्य सुविधा आणि स्वच्छतेमुळे भक्कम पाठिंबा मिळालेल्या लाखो महिला कार्यक्षेत्र आणि सार्वजनिक जीवनात आपले स्थान निर्माण करत आहेत. देशात ३८७ वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यासाठी ६० वर्षे लागली. केवळ दहा वर्षांच्या कालखंडात ही संख्या ७८० वैद्यकीय महाविद्यालयांपर्यंत पोहोचली. तसेच २०१४ मध्ये वैद्यकीय तज्ज्ञांना प्रशिक्षण देण्यासाठी देशात २८,५०० पदव्युत्तर जागा होत्या आणि आज त्या ७५,०९२ जागा झाल्या आहेत. आज भारतात दरवर्षी १,१८,०० डॉक्टर्स तयार होतात. हे प्रमाण जगात सर्वाधिक आहे. आरोग्यसेवेचा पाया डॉक्टर्स, परिचारिका आणि पॅरामेडिक्सवर बांधला गेला आहे. आज भारत केवळ भारतासाठीच नव्हे, तर जगभर आरोग्यसेवा पुरवण्यासाठी सर्वात जास्त कुशल कामगारांची निर्मिती करतो. भारत २०४७ कडे वाटचाल करेल, तसतसे याचे लाभांश कितीतरी पटीने वाढत जातील. सर्वसमावेशक, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा हा आता एक प्राथमिक मुद्दा राहिलेला नाही. तो राष्ट्रीय सामर्थ्याचा कणा आणि आर्थिक परिवर्तनाचे निर्णायक साधन बनला आहे..

# शेतकऱ्यांसाठी नवा ई-ट्रॅक्टर आला

## खरेदीवर मिळणार दीड लाखांपर्यंत अनुदान




**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक**

इलेक्ट्रिक ट्रॅक्टर शेतकरी आणि उद्योग क्षेत्रासाठी वरदान ठरेल आणि देशात मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रिक क्रांती घडवेल, असा विश्वास परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी रविवारी ठाण्यात व्यक्त केला.

ई-ट्रॅक्टरची निर्मिती करणारे ठाण्यातील उद्योजक असल्याने ठाण्यासाठी ही अभिमानाची बाब असल्याचेही ते म्हणाले. ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात देशातील पहिल्या ई-ट्रॅक्टरची नोंदणी एका विशेष कार्यक्रमात झाली. यावेळी सरनाईक बोलत होते.

सरनाईक म्हणाले की, २०३० पर्यंत रस्त्यावरील एकूण वाहनांच्या संख्येमध्ये २० ते ३० टक्के वाहने ही विजेवर चालणारी असावीत, असे सरकारचे धोरण आहे.

त्या अनुषंगाने ई-वाहनांना टोलमाफी, तसेच खरेदीवर थेट अनुदान देण्याची सरकारची योजना आहे. डिझेल ट्रॅक्टरच्या तुलनेमध्ये ई-ट्रॅक्टरचा देखभाल-दुरुस्तीचा खर्च अत्यल्प आहे. विजेचा खर्च डिझेल इंधनाच्या तुलनेत ६० ते ७० टक्के कमी होणार आहे. त्यामुळे भविष्यात ई-ट्रॅक्टर शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार आहे.

दीड लाखांपर्यंत अनुदान

ई-ट्रॅक्टर खरेदीवर महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रिक वाहन धोरणांतर्गत दीड लाखांपर्यंत अनुदान देणार आहे.

एक एकर नांगरणीसाठी ई-ट्रॅक्टरला केवळ ३०० रुपये खर्च येतो. या उलट डिझेल ट्रॅक्टरला हाच खर्च १,२०० ते १,५०० रुपयांपर्यंत जातो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पैशांची बचत होणार आहे.

**इलेक्ट्रिक मोबिलिटीतील ऐतिहासिक क्षण**भारतातील पहिला स्वदेशीनिर्मित इलेक्ट्रिक ट्रॅक्टर बाजारात आणला असून, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या ट्रॅक्टरचे अनावरण केले होते. त्याचीच नोंदणी आज आपल्या हस्ते होत असल्याचे सरनाईक या वेळी म्हणाले. देशाच्या इलेक्ट्रिक मोबिलिटीच्या प्रवासातील एक ऐतिहासिक क्षण असल्याचेही ते म्हणाले

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष


शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




## उपवासासाठी 'हे' आरोग्यदायी पर्याय निवडा

दि.२४विदर्भ प्रजासत्ताक १

नवरात्रीचा पवित्र सण देशभरात मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. या काळात अनेक लोक नऊ दिवसांचा उपवास करतात. उपवासामुळे शरीराला डिटॉक्स (वर्शी) होण्याची संधी मिळते, पण अनेकदा लोक उपवासाच्या नावाखाली अशा गोष्टी खातात ज्यात आवश्यकतेपेक्षा जास्त कॅलरीज असतात. यामुळे वजन वाढण्यासोबतच पचनसंस्थेच्या समस्याही सुरू होतात. म्हणूनच, नवरात्रीच्या उपवासादरम्यान तुमचा आहार संतुलित ठेवणे खूप महत्त्वाचे आहे.



**उपवासात जास्त कॅलरी घेण्याच्या सामान्य चुका**

**तळलेले पदार्थ:** साबुदाणा वडा, बटाट्याचे वेफर्स किंवा कुट्टूच्या पिठाची पुरी यांसारखे तळलेले पदार्थ उपवासात जास्त खाल्ले जातात. यात तेल आणि कॅलरीजचे प्रमाण खूप जास्त असते.

**जास्त गोड पदार्थ:** मखण्याची खीर, नारळाचे लाडू किंवा हलवा हे उपवासात गोड खाण्याची इच्छा पूर्ण करतात, पण यात साखर आणि कॅलरीज भरपूर असतात.

**फळांचा अतिरेक:** फळे आरोग्यासाठी चांगली असली, तरी जास्त प्रमाणात खाल्ल्यास शरीरात नैसर्गिक साखरेचे (फ्रुक्टोज) प्रमाण वाढते, ज्यामुळे कॅलरीज वाढतात.

**सुकामेवा जास्त खाणे:** बदाम, काजू, किशमिश आणि अक्रोड पौष्टिक असले तरी, मर्यादेशिवाय खाल्ल्यास कॅलरीचे प्रमाण खूप वाढते.

**उपवासात आहार कसा संतुलित कराल?**

**उकडलेले किंवा भाजलेले पदार्थ खा:** बटाटे आणि साबुदाणा तळण्याऐवजी उकडून किंवा हलके भाजून खा.

**लो-फॅट दूध आणि दही:** खीर किंवा स्मूदी बनवताना कमी फॅटचे दूध किंवा दही वापरा.

**साखरेवर नियंत्रण:** गोड पदार्थांसाठी साखरेऐवजी गूळ, मध किंवा खजुराचा वापर करा, पण त्याचे प्रमाण कमी ठेवा.

**फळे योग्य प्रमाणात खा:** एकाच वेळी जास्त फळे खाण्याऐवजी दिवसातून थोड्या थोड्या वेळाने फळांचे मिश्रण खा.

**पाणी भरपूर प्या:** उपवासात शरीर हायड्रेटेड ठेवणे खूप महत्त्वाचे आहे. नारळ पाणी किंवा लिंबू पाणी उत्तम पर्याय आहेत.

**नवरात्रीसाठी आरोग्यदायी पर्याय**

**समक तांदळाची खिचडी किंवा इडली:** हे पदार्थ पचायला हलके आणि पौष्टिक असतात.

**शेंगदाणे:** थोडे भाजलेले शेंगदाणे खाल्ल्याने भूक कमी होते आणि ऊर्जा मिळते.

**रताळयाची चाट:** उकडलेल्या रताळ्याची चाट एक चांगला आणि आरोग्यदायी पर्याय आहे.

**राजगिऱ्याचा पराठा:** कमी तेलात बनवलेला राजगिऱ्याचा पराठा फायबर आणि मिनरल्सने भरपूर असतो.

**हर्बल टी:** ग्रीन टी किंवा इतर हर्बल टी प्यायल्याने शरीर फ्रेश राहते.

# ६ लाखांत झेडपी, १० लाखांत मनपा लढवायची तरी कशी?

## खर्चाची मर्यादा वाढवण्याची मागणी
## ९ वर्षांनंतरही खर्चा मर्यादा तशीच कायम






**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती** – स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पैशांची प्रचंड उधळपट्टी केली जाते, ही बाब आता लपून राहिलेली नाही. मात्र, त्याचवेळी या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने घालून दिलेली खर्चाची मर्यादा बघितली तर इतक्या कमी पैशांमध्ये निवडणूक लढणार कशी? हा प्रश्नच पडतो.

महापालिका आणि जिल्हा परिषदांसाठीची निवडणूक खर्च मर्यादा ही १ जानेवारी २०१७ रोजी निश्चित करण्यात आली होती. ती ९ वर्षांनंतरही तशीच कायम आहे. नगर परिषदा आणि थेट नगराध्यक्ष निवडणुकीसाठी खर्चाची मर्यादा ही ऑक्टोबर २०१६ मध्ये निश्चित करण्यात आली होती. ती अजूनही तशीच आहे. खर्चाची ही मर्यादा वाढवावी, अशी मागणी आता होत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला तीन-तीन कोटी रुपये खर्च येतो अन् कधीकधी १०० बोकड कापावे लागतात, असे विधान शिंदेसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी अलीकडेच केले होते. राजकीय क्षेत्रातील जाणकार सांगतात, की जिल्हा परिषद, महापालिका निवडणुकीत एकेक दोन-दोन कोटी रुपये खर्च करावे लागतात. घरामागे पैसे मोजावे लागतात. कार्यकर्त्यांच्या जेवणावळी, पेट्रोल-पाणी वेगळे.

### महापालिकेसाठी काय आहे खर्चाची मर्यादा?

| श्रेणी / सदस्यसंख्या | खर्चाची मर्यादा |
|---|---|
| मुंबई महापालिका | १० लाख रु. |
| १६१ ते १७५ सदस्यसंख्या | १० लाख रु. |
| १५१ ते १६० सदस्यसंख्या | १० लाख रु. |
| ११६ ते १५० सदस्यसंख्या | ८ लाख रु. |
| ८६ ते ११५ सदस्यसंख्या | ७ लाख रु. |
| ६५ ते ८५ सदस्यसंख्या | ५ लाख रु. |

### थेट नगराध्यक्षाच्या निवडणुकीसाठी खर्चाची मर्यादा

| वर्ग | खर्चाची मर्यादा |
|---|---|
| अ वर्ग | १० लाख रु. |
| ब वर्ग | ७.५० लाख रु. |
| क वग | ५ लाख रु. |

### नगर परिषदांमध्ये खर्च मर्यादा

| वर्ग / नगरपंचायत | खर्चाची मर्यादा |
|---|---|
| अ वर्ग | ३ लाख रु. |
| ब वर्ग | २ लाख रु. |
| क वर्ग | १.५० लाख रु. |
| नगर पंचायत | १.५० लाख रु. |

### जिल्हा परिषद व त्याअंतर्गतच्या पंचायत समित्यांचा खर्च

| गटसंख्या (जिल्हा) | जिल्हा परिषद खर्चाची मर्यादा | पंचायत समिती खर्चाची मर्यादा |
|---|---|---|
| ७१ ते ७५ गट | ६ लाख रु. | ४ लाख रु. |
| ६१ ते ७० गट | ५ लाख रु. | ३.५० लाख रु. |
| ५० ते ६० गट | ४ लाख रु. | ३ लाख रु. |







निवडणुकीसाठी वाढलेला खर्च, महागाईचा विचार करून राज्य निवडणूक आयोगाने यावेळच्या निवडणुकीसाठी उमेदवारांच्या खर्चाची मर्यादा तातडीने वाढविणे आवश्यक आहे. सध्याच्या मर्यादेत आज निवडणूक लढणे अशक्य आहे.

**– राजकिशोर (पापा) मोदी, माजी अध्यक्ष, नगराध्यक्ष संघटना.**

# जि.प. शाळा, सालोरा बु. येथे IAS अधिकारी कौशल्या एम. यांची सदिच्छा भेट




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४तिवसा** – मंगळवारी जि.प. पूर्व माध्यमिक शाळा, सालोरा बु. येथे मा. कौशल्या एम. (ख-ड अधिकारी) यांनी सदिच्छा भेट दिली. या भेटीत त्यांनी शाळेचा संपूर्ण आढावा घेतला. शालेय परिसर, स्वच्छता, व शैक्षणिक प्रगती याची पाहणी केली.निपुण भारत उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांशी व शिक्षकांशी थेट संवाद साधत शाळेतील शैक्षणिक उन्नतीची माहिती घेतली. त्यांनी शाळेतील बोलक्या भिंती, परिसरातील स्वच्छता व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले.

या वेळी गटविकास अधिकारी मा. अभिषेक कासोदे, सहायक गटविकास अधिकारी मा. नारायण आमझरे, गटशिक्षणाधिकारी मा. डॉ. नितीन उंडे, व गटसमन्वयक मा. अतुल देशमुख उपस्थित होते.गावच्या सरपंच श्रीमती ममताताई जाधव यांनी मान्यवरांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी मा. कासोदे, मा. आमझरे, व मा. डॉ. उंडे यांचेही पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.शाळेचे मुख्याध्यापक श्री. गजानन काकडे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल मा. कौशल्या एम. ख-ड अधिकारी यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

शाळेच्या उन्नतीसाठी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सर्व अधिकारी वर्ग व स्थानिक प्रशासन यांची भूमिका उल्लेखनीय ठरली.

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २३ सप्टेंबर २०२५

शहर/ग्रामिण



# बंद असलेल्या ओव्हरब्रिज संदर्भात काय नियोजन? काँग्रेसचा प्रशासनाला प्रश्न

## १० दिवसांचा दिला अल्टिमेटम नाही तर....सर्व रेल्वे रोखणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती**

अमरावती रेल्वे स्थानक ते राजकमल चौक यादरम्यानचा रेल्वे ओव्हरब्रिज वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आलेला आहे.शहराच्या प्रमुख भागांना जोडणारा हा मार्ग बंद झाल्यामुळे संपूर्ण शहरात वाहतुकीचा प्रचंड गोंधळ निर्माण झाला आहे, असे सांगत रेल्वे, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा प्रशासन, महापालिका व शहर पोलिस प्रशासनाने पूल व त्यासंदर्भातील वस्तुस्थिती, नियोजन, उपाययोजना इत्यादींची माहिती जनतेसाठी १० दिवसांत सार्वजनिक करावी, अन्यथा रेल्वेरोको आंदोलन केले जाईल, असा गंभीर व थेट इशारा अमरावती शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने संबंधितांना पाठविलेल्या पत्रातून दिला आहे.

शहराची लाईफलाईन असलेला अमरावती रेल्वे ओव्हरब्रीज वाहतुकीसाठी पूर्णतः बंद करण्यात आल्याने दैनंदिन प्रवासी, व्यापारी, विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. जयस्तंभ चौक, इर्विन चौक, सरोज चौक, चित्रा चौक, यासारख्या प्रमुख ठिकाणी दररोज वाहतुकीचा कोंडी होणे ही बाब आता सामान्य झाली आहे. शहराच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. २२



सप्टेंबर २०२५ पासून नवरात्रोत्सव सुरू झालेला आहे. अमरावती शहरात अत्यंत प्राचीन आणि कुलदैवत असलेले आई अंबा माता आणि एकवीरा देवीचे भव्य मंदिर आहे. दरवर्षी या उत्सवात अमरावती जिल्ह्याच्या व्यतिरिक्त परभणी, अकोला, वाशिम, बुलढाणा यासारख्या आजूबाजूच्या जिल्ह्यांमधून लाखो भाविक दर्शनासाठी येतात. यंदाही नवरात्रोत्सवात आई अंबादेवी मंदिरात लाखो भक्तांचा ओघ असणार आहे. मात्र, रेल्वे ओव्हरब्रिज बंद असल्यामुळे शहरात येणाऱ्या या भक्त मंडळींना मोठा त्रास होत असल्याचे दिसून येत आहे. उत्सवाच्या कालावधीत गोंधळ वाढण्याची भीती आहे. वाहतुकीचे पर्यायी मार्ग अपुरे असल्याने तत्काळ वाहतूक विभागासोबत बैठकघेऊन यासंदर्भात पर्यायी व्यवस्था करावी तसेच या संदर्भात भुसावळ रेल्वे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महानगरपालिकेकडून कोणतेही नियोजन जाहीर करण्यात आलेले नाही.दुसरीकडे, बंद करण्यात आलेला रेल्वे ओव्हरब्रिज संदर्भातील भविष्यातील नियोजन काय आहे? हा पूल दुरुस्त करण्याचे कार्य कधी सुरू होणार आहे? किंवा तो तोडण्याचे कार्य कधी सुरू होणार आहे? पुढील रुपरेषा काय ठरणार आहे? यासंबंधात भूसावळ रेल्वे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागाची भूमिका काय राहणार आहे? स्थानिक जिल्हा प्रशासन आणि महानगरपालिका यांची भूमिका काय असेल? या सर्व प्रश्नांची उत्तरे आजपर्यंत सामान्य जनतेला माहिती नाहीत. यासंदर्भात रेल्वे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महानगरपालिका यांच्यात कोणतीही चर्चा झालेली दिसत नाही. या विभागांनी या बाबीला गांभीर्याने घेतलेले नाही, यामुळे अमरावतीकर जनतेचे अतोनात हाल होत आहेत, असे काँग्रेसचे शहर जिल्हा अध्यक्ष बबलू शेखावत यांनी भूसावळ येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम), मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त, पोलीस आयुक्तांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे.

येत्या १० दिवसांत वाहतुकीचे तात्काळ नियोजन कसे करणार आहात ? पर्यायी मार्ग, वाहन वळवणी, ट्रॅफिक पोलिसांची नियुक्ती इत्यादींबाबत सविस्तर नियोजन करण्यात यावे, रेल्वे ओव्हरब्रिजच्या दुरुस्ती/पुनर्निर्माणाचे भविष्यातील नियोजन काय आहे? दुरुस्तीचे कार्य कधी सुरू होणार आहे? तोडण्याचे कार्य कधी सुरू होणार आहे?

संपूर्ण प्रकल्पाची पुढील रुपरेषा काय?, महाराष्ट्र शासन, भूसावळ रेल्वे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महानगरपालिका यांनी आपापल्या भूमिका स्पष्ट कराव्यात, या विभागांमधील चर्चेचे निकालपत्र काय?, त्याची इत्यंभूत माहिती सर्वसामान्य जनतेसाठी ठळक व व्यापक स्वरूपात जाहीर करावी, अशी मागणी काँग्रेसचे शहराध्यक्ष बबलू शेखावतयांनी उपरोक्त पत्रांतून केलेली आहे. जर वरील मागण्या १० दिवसांत पूर्ण केल्या गेल्या नाहीत, तर अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीतर्फे भव्य रेल्वे रोको आंदोलन करण्यात येईल, याची नोंद घेऊन तात्काळ कारवाई करावी, असाही इशारा शहर काँग्रेस कमिटीतर्फे बबलू शेखावत यांनी दिला आहे.

# पुरातन माताजी देवस्थानात भक्तांचा अपार श्रद्धेचा सागर

## नवरात्रोत्सवात ३०१ अखंड ज्योती, धार्मिक कार्यक्रम

### दररोज कन्या भोजन, सप्तमीस कुमकुम अभिषेक तर नवमीस महाप्रसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ धामणगाव रेल्वे –** प्रत्येक वर्षाप्रमाणे याही वर्षी शारदीय नवरात्र उत्सवात शहराच्या मध्यवर्ती भागातील प्राचीन माताजी देवस्थान भक्तांनी फुलून गेले आहे. श्रद्धा आणि आस्थेचा असा उधाण आलेला की भक्तांनी कोणतीही कसर ठेवलेली नाही. अश्विन आणि चैत्र नवरात्रांमध्ये येथे विविध धार्मिक अनुष्ठानं होतात. भक्तांच्या मनोकामना पूर्णीसाठी ३०१ अखंड ज्योती नवमीपर्यंत प्रज्वलित ठेवण्यात येतात.

सप्तमीला माताजींचा अनुपम कुमकुम अभिषेक केला जातो. त्यानंतर देवीचंस्वरूप अत्यंत मनमोहक दिसतं. शेकडो भक्त या



प्रसंगाचा लाभ घेतात. नऊ दिवस– दिव्यांची प्रभात मंगल आरती भक्तांना नवचैतन्याचा अनुभव देते. या काळातआसपासच्या ग्रामीण भागातून व शहरातून शेकडो महिला अनवाणी पायांनी माता चरणी माथा टेकवायला येतात. सकाळ संध्याकाळ दोन्ही वेळची आरती संगीत वउल्लासाच्या वातावरणात पार पडते. नवरात्रोत्सवात दररोज कन्या भोजन, अष्टमीला होमहवन व बुधवार १ ऑक्टोबर रोजी नवमीस महाप्रसादाचे आयोजन ठेवण्यात आले आहे. मंदिर परिसराचे वातावरण भक्तिभाव व श्रद्धेने ओथंबून गेलेले असते. येथे देवाधिदेव महादेव मंदिर, शीतला माता मंदिर व भैरव बाबा मंदिरही आहेत. मुख्य मंदिराच्या गर्भगृहात त्रिशूलासह मां भगवतीची मनमोहक प्रतिमा विराजमान आहे. याशिवाय एका बाजूस वैष्णव माताची पिंडी व दुसऱ्या बाजूस शंकरजींची पिंड स्थापित आहे. दररोज माताजींच्या मूर्तीचा विशेष शृंगार भक्तांच्या आस्थेला अधिक दृढ करतो. धार्मिक अनुष्ठानाच्या यशस्वीतेसाठी पुजारी पप्पू महाराज शर्मा यांच्यासह शेकडो भक्त सक्रिय भूमिका बजावत आहेत.

# अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची अग्निशमन मुख्य कार्यालय वालकट कंपाऊंड व संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन परिसर पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ अमरावती** अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजी अग्निशमन मुख्य कार्यालय वालकट कंपाऊंड, जिल्हा सामान्य रुग्णालयचा समोरील भाग, खापर्डे बगीचा परिसर तसेच संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन परिसराची पाहणी केली.

या पाहणी दरम्यान आयुक्तांनी अग्निशमन मुख्य कार्यालयातील नियोजनाबाबत सविस्तर माहिती घेऊन आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या. परिसरातील स्वच्छता राखण्यासाठी तत्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच अतिक्रमण निर्मूलनासाठी नियोजनबद्ध कार्यवाही हाती घेण्याचे आदेश संबंधीत विभागाला देण्यात आले.



यावेळी संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथील चालू असलेल्या नियोजनाची पाहणी करून नागरिकांच्या सुविधा लक्षात घेऊन अधिक कार्यक्षमतेने नियोजन राबविण्याचे निर्देश आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी संबंधित अधिका–यांना दिले.महानगरपालिका प्रशासनाच्या विविध विभागांमध्ये समन्वयातून नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात या उद्देशाने पाहणी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी निर्देश की, अग्निशमन मुख्य कार्यालय येथे आवश्यक ते नियोजन करून नागरिकांच्या सुरक्षेसाठी सेवा अधिक सक्षम करावी. परिसरातील स्वच्छता कायम ठेवण्यासाठी तत्काळ उपाययोजना करून नियमित स्वच्छता मोहीम राबवावी. इर्विन चौक व खापर्डे बगीचा परिसरातील अतिक्रमण निर्मूलनासाठी काटेकोर अंमलबजावणी करावी. संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथील चालू नियोजन नागरिकांसाठी उपयुक्त, शिस्तबद्ध व कार्यक्षमतेने राबवावे. संबंधित विभागांनी समन्वयातून कामकाज करून नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी नागरिकांना आवाहन केले की, नागरिकांनी महानगरपालिकेस सहकार्य करून आपल्या शहरातील स्वच्छता, अतिक्रमण निर्मूलन व शिस्तबद्ध नियोजन यामध्ये आपला सहभाग द्यावा.

अग्निशमन विभागाच्या सेवा सक्षम होण्यासाठी तसेच सांस्कृतिक भवन परिसराचा अधिक चांगला उपयोग नागरिकांना व्हावा यासाठी आपण सर्वांनी जागरूक राहणे आवश्यक आहे. अमरावती ही आपलीच जबाबदारी आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने स्वच्छता राखणे, अतिक्रमण टाळणे व शहरी सुविधांचा जपून उपयोग करणे या बाबींमध्ये सक्रीय सहभाग नोंदवावा. आपल्या सहकार्यामुळे शहर अधिक सुरक्षित, स्वच्छ व सुबक बनविणे शक्य होईल.

या पाहणी माजी गटनेता दिनेश बुब, शहर अभियंता रविंद्र पवार, मुख्य अग्निशमन प्रमुख लक्ष्मण पावडे, अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश रघटाटे, शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, बाजार व परवाना विभागाचे सहाय्यक आयुक्त दिपक खडेकार, अग्निशमन अधिक्षक संतोष केंद्रे, उपअभियंता प्रमोद इंगोले, दिनेश हंबर्डे, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# आ. गोपीचंद पडळकर यांच्या पोस्टरला चपलांनी बदडले

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गट आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ अमरावती–** भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते माजी मंत्री जयंत पाटील यांच्या विरोधात वैयक्तिक खालच्या पातळीवर टीका केल्याचा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख यांनी पत्रपरिषदेतून निषेध केला. त्यानंतर पत्रकार भवनाच्या परिसरातच आमदार गोपीचंद पडळकर यांच्या पोस्टरला चपलाने बदडून कार्यकर्त्यांनी रोष व्यक्त केला. पडळकर यांच्यावर कारवाई करण्यात यावी या मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले.

आमदार गोपीचंद पडळकर यांनी माजी मंत्री जयंत पाटील यांच्यावर केलेली खालच्या पातळीची वैयक्तिक टीका ही महाराष्ट्राच्या संस्कृतीला शोभणारी नाही. स्व. राजारामबापू यांनी स्वातंत्र्य लढ्यात योगदान देत सहकाराची पाळेमुळे पश्चिम महाराष्ट्रभर रुजविली. अशा महान व्यक्तिमत्वाचा उल्लेख आमदारगोपीचंद पडळकर यांनी हलक्याफुलक्या भाषेत केल्याबद्दल आमदार गोपीचंद पडळकर यांचा जाहीर निषेध करण्यात येत असल्याचे प्रा. डॉ हेमंत देशमुख यांनी सांगितले. राज्यात दुष्काळ व इतर अनेकगंभीर समस्या असताना त्यावर भाष्य न करता समाजात वाद निर्माण करणारे वक्तव्य करणे, हा मतदारांचाविश्वासघात असल्याचे देशमुख म्हणाले. जर गोपीचंद पडळकर यांचे वक्तव्य वेळेत भाजपने रोखले असते तर आज ही वेळ आली नसती. पूर्वी भाजपमध्ये गेलेल्या कोणत्याही नेत्यांनी विरोधकांवर टीका केली तरी कधीही एवढ्या खालच्या भाषेत केली नाही. ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची परंपरा नाही. त्यामुळे गोपीचंद पडळकर यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी शहर जिल्हाध्यक्ष प्रा.डॉ. हेमंत



देशमुख यांनी केली.पत्रपरिषद, आंदोलन तसेच जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना प्रदेश सरचिटणीस निखिल देशमुख, मंगेश भटकर, सय्यद मन्सूर, राजा चिंचमालापुरे, वर्षा भटकर, विशाल गोरखडे, सतीश चरपे, प्रफुल्ल डोंगरे, वेदांत उगले, रामवीर पाटील, विजय राजुरकर, महेंद्र इंगळे, वैभव लोखंडे, सुरज रामटेके, चेतन गुलवाने यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# नवरात्रीत उपवासाला भगर खाताय, मग वेळीच सावध व्हा! कारण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४यवतमाळ :** भक्तीचे नवरंग उधळ नवरात्रोत्सव सुरू झाला आहे. या काळात असंख्य भक्त भक्तिभावाने दुर्गादेवीची उपासना करताना. उपवास हा नवरात्रोत्सवातील उपासनेचा महत्वाचा भाग आहे. मुख्य भोजन न करता केवळ फळ, दूध, साबुदाणा, भगर या पदार्थांना प्राधान्य दिले जाते. मात्र उपवासाचे पावित्र्य टिकवण्यासाठी तुम्ही भगर खात असाल तर वेळीच सावध व्हा. खुद्द यवतमाळ जिल्हा प्रशासनाने या संदर्भात पत्रक काढून, भाविकांना भगर खाण्यापूर्वी काळजी घेण्याचे



आवाहन केले आहे.नवरात्रीच्या या नऊ दिवसांत भाविक उपवास करतात. या दरम्यान मोठ्या प्रमाणात भगरीचे सेवन केले जाते. भगर खाल्ल्यामुळे विषबाधा झाल्याच्या अनेक घटनांची नोंद यापूर्वी अनेक जिल्ह्यात झाली आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती जिल्ह्यात होऊ नये, यासाठी प्रशासनाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहे. तसेच अन्न व औषध प्रशासनानेही भगर विक्री करणाऱ्या दुकानांची तपासणी मोहीम हाती घेतली आहे. सध्या पाऊस सुरू आहे. पावसाळ्यातील वातावरण बुरशीच्या वाढीसाठी अनुकूल असते.भगरीवर मोठ्या प्रमाणात 'अस्परबिलस' प्रजातीच्या बुरशीचा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे 'फ्युमिगाक्लेवीन' यासारखी विषद्रव्ये तयार होतात.बुरशीचा प्रादुर्भाव झालेली भगर खाण्यात आल्यास विषबाधा होऊ शकते, असे प्रशासनाने जारी केलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# जिल्हा परिषद, पं. स. निवडणूक; मतदारयादी कार्यक्रम जाहीर

## ८ ऑक्टोबरला प्रारुप मतदारयादी प्रसिद्ध होणार, २७ ला अंतिम प्रसिद्धी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती–** अमरावती जिल्हा परिषद, पंचायत समितीनिवडणुकीसाठी मंगळवारी मतदारयादी कार्यक्रम जाहीर करण्यात आला. ८ ऑक्टोबरला प्रारुप मतदान यादी प्रसिद्ध होणार असून २७ऑक्टोबरला अंतिम मतदारयादी प्रसिद्धी केली जाणार आहे. त्यानंतर लगेच निवडणूक कार्यक्रम लागण्याची देखील शक्यता आहे. सोबतच आरक्षणाचा कार्यक्रम देखील लागण्याची शक्यता आहे.

राज्य निवडणूक आयोगाने राज्यात ३२ जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदारयादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर केला आहे. यामध्ये जिल्ह्यात जिल्हा परिषदेसह १४ पंचायत समित्यांचा समावेश आहे. या कार्यक्रमानुसार मतदार यादीशी संबंधित टप्पे सप्टेंबर ते ऑक्टोबर दरम्यान पूर्ण केले जाणार आहेत. १ जुलैची मतदारयादी ग्राह्य धरीत ८ ऑक्टोबर रोजी मतदारयादी




प्रसिद्ध केली जाणार आहे. यावर १४ ऑक्टोबरपर्यंत आक्षेप व हरकती स्वीकारल्या जाणार आहे. या आक्षेपानंतर २७ऑक्टोबर रोजी अंतिम मतदारयादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

**आरक्षणापूर्वी मतदारयादी कार्यक्रमामुळे संभ्रम–** जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या प्रभागरचनेनंतर गट व गणाच्या आरक्षणाची उत्सुकता असताना अचानक मतदारयादीचा कार्यक्रम लागल्याने गावपुढाऱ्यांची निराशा झाली. दरम्यान, जिल्हा परिषद अध्यक्षांचे आरक्षण तसेच पंचायत समितीच्या आरक्षणाची संख्या निश्चित करण्यात आली. त्यामुळे या आठवड्यात गट व गणाच्या आरक्षण कार्यक्रम लागण्याची शक्यता होती. अचानक मतदारयादीचा कार्यक्रम जाहीर केल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

# पंचक्रोशीतल्या भक्तांचे श्रद्धास्थान मुर्हादेवी

## दररोज हजारो भाविक घेत आहे दर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अंजनगाव सुर्जी**
तालुक्याचे आराध्य दैवत असलेल्या मुर्हादेवी येथील आई जगदंबा देवी व झिंग्राजी महाराज संस्थान येथे सोमवार २२ सप्टेंबरपासून नवरात्रोत्सवाला सुरुवात होत असून या उत्सवात येथे भाविकांची मोठी गर्दी व यात्रा उत्सव होत असल्याने शांततेत उत्सव पार पडावा यासाठी मंदिराचे विश्वस्त मंडळ, ग्रामपंचायत व गावकर्यांच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे. शिवाय नऊ दिवस चालणार्या या उत्सवात मुर्हादेवी गावाला यात्रेचे स्वरूप येत असल्याने शांतता व सुरक्षेसाठी यात्रेकरू व गावकर्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन पोलिस प्रशासन व सरपंच संध्यापखान, उपसरपंच त्रिशला वानखडे, ग्रामसचिव अनंत बहादुरे, संस्थानचे अध्यक्ष साहेबराव पखान, उपाध्यक्ष चंद्रशेखर घोगरे, सचिव रमेश पांडे, सदस्य दीपक घोगरे, गोवर्धन बोंदरे, चंद्रशेखर बोंदरे यांनी केले आहे.

मंदिरा बाहेरील परिसरात ग्रामपंचायतच्या वतीने यात्रा भरवण्यासाठी दुकाने थाटण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. वाहनांच्या पार्किंगसाठी व्यवस्था करण्यात आली आहे.

मंदिर परिसरात दर्शनासाठी कठडे तयार करण्यात आले असून सर्व परिसर सीसीटीव्ही कॅमेर्याने कैद करण्यात आला आहे. चिंचोली रहिमापूर पोलिसांच्या वतीने उत्सव काळात येथे मोठा बंदोबस्त लावण्यात आला असून या परिसरात चौकी सुद्धा उभारण्यात आली आहे. सोमवारी घटस्थापना होऊन नवरात्रोत्सवाला सुरुवात होत असून नवसाला पावणारी आई जगदंबा देवीच्या दर्शनासाठी भक्तांची मांदियाळी या ठिकाणी राहणार आहे. भाविकांच्या मनोकामना पूर्ण करणारी व नवसाला पावणारी आई जगदंबा अशी भक्तांची श्रद्धा असल्याने नवरात्री महोत्सवात पंचक्रोशीसह राज्यातून दूरवरून भाविक दर्शनासाठी मुर्हादेवी येथे येतात व देवीला साकडे घालतात.

# महिलांनी नियमित आरोग्य तपासणी करणे आवश्यक

## डॉ. भावना सोनटक्के यांचे कर्करोगावर मार्गदर्शन

### जागर महिला आरोग्याचा' उपक्रमाला सुरवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती–** महिलांमध्ये कर्करोगाबद्दल असंख्य गैरसमज पसरले आहेत. मात्र कर्करोगाचे निदान अगदी सुरवातीच्या टप्प्यात झाल्यास हा रोग पूर्णपणे बरा होणारा आहे. त्यामुळे महिलांनी नियमित आरोग्य तपासणी करून कर्करोगाला वेळीच आळा घालावा, असे आवाहन कर्करोग तज्ज्ञ डॉ. भावना सोनटक्के यांनी केले.पूण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या तिनशेव्या जयंतीनिमित्त जिल्हा प्रशानातर्फे विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नवरात्रोत्सवात महिलांच्या आरोग्याबाबत दि. ३० सप्टेंबरपर्यंत जिल्हा नियोजन भवन येथे मार्गदर्शन आणि तपासणी शिबिर घेण्यात येत आहे. कर्करोग तज्ज्ञ डॉ. भावना सोनटक्के यांनी कर्करोगाची तपासणी आणि उपचार यावर मार्गदर्शन केले. डॉ. सोनटक्के म्हणाल्या, स्त्रिया बरेचदा कामाला जास्त प्राधान्य देऊन प्रकृतीकडे दुर्लक्ष करतात. यामुळे शारीरिक व मानसिक तणाव वाढून दीर्घकालीन उपचार घ्यावे लागतात. यासाठी स्त्रियांनी आरोग्याला प्रथम प्राधान्य द्यावे. नियमित आवश्यक आरोग्य तपासण्या करून घ्याव्यात. भारतामध्ये कर्करोगाच्या रुग्णाचे प्रमाण वाढत आहे. बदलती जीवनशैली, ताणतणाव आणि चुकीच्या खाण्याच्या पद्धती बदलवून उत्तम आरोग्यशैली पूर्ण जीवन जगण्यासाठी स्वतःहून लक्ष केंद्रित करावे. घरातील महिलेची प्रकृती उत्तम राहिल्यास ती परिवारातील अन्य सदस्यांची काळजी चांगल्या प्रकारे घेवू शकते. यासाठी महिलांनी स्वतःच्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नये.

जीवनशैलीतील बदलामुळे शहरी आणि ग्रामीण भागात कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. वेळीच निदान आणि उपचारामुळे हा आजार बरा होणे शक्य आहे. स्तनाचे कर्करोगाची तपासणी स्त्रियांनी दर महिन्याला घरीच करावी. काही लक्षणे आढळल्यास तात्काळ तज्ज्ञ डॉक्टरांशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. श्वेत प्रदर रोगावरील उपचार व काळजी, मासिक पाळीच्या काळात घ्यावयाची काळजी, सकस आहाराचे महत्त्व, व्यायाम याबाबात डॉ. भावना सोनटक्के यांनी सखोल माहिती दिली. तसेच उपस्थित महिलांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.

# किटकजन्य आजाराचे थैमान; डेंग्यू, चिकन गुनियाचा अकोल्यात वाढता प्रकोप

## राज्यस्तरीय पथकाने घेतला आढावा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अकोला :**
किटकजन्य आजाराचे थैमान घातले असून डेंग्यू, चिकन गुनिया आजाराचे असंख्य रुग्ण आढळून येत आहेत. शहरातील एका सात वर्षीय चिमुकलीला डेंग्यूची लागण झाली. तिच्यावर सर्वोपचार रुग्णालयात उपचार सुरू आहे. किटकजन्य व साथीच्या आजाराच्या रुग्णांमध्ये अचानक झपाट्याने वाढ झाल्याने पुणे येथील आरोग्य विभागाच्या पथकाने अकोल्यात दाखल होत आढावा घेतला.पावसाचे पाणी सर्वत्र साचले आहे. या पाण्यामुळे किटक व डासांचा प्रादुर्भाव वाढला. किटकजन्य व साथीच्या आजाराचा वाढता उद्रेक अकोलेकरांच्या आरोग्याला बाधा निर्माण करणारा ठरला आहे. डेंग्यू, चिकुन गुनिया आणि मलेरिया सारख्या किटकजन्य आजारांचे रुग्ण शहरात मोठ्या प्रमाणात आढळत आहेत. त्याचबरोबर तापसदृश आजाराच्या साथीनेही शहरात उद्रेक घातला आहे. घराघरात तापसदृश आजाराचे रुग्ण आढळत आहेत. अंगदुखी, डोके दुखी, ताप येणे, थकवा जाणवणे अशी या आजाराची लक्षणे आहेत. शासकीय रुग्णालयासह खासगी, दवाखान्यांमध्ये उपचार घेणाऱ्या तापसदृश आजाराच्या साथीच्या रुग्णांची संख्या मोठी आहे.

शहरातील वाढत असलेला किटकजन्य आजाराचा उद्रेक लक्षात घेता पुणे येथील आरोग्य सेवा सहसंचालकांच्या कार्यालयातील चमूने अकोला जिल्ह्यात भेट देऊन आढावा घेतला. यामध्ये राज्य किटक शास्त्रज्ञ डॉ. महेंद्र जगताप, सहाय्यक संचालक डॉ. प्रेमचंद कांबळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. सुळे यांचा समावेश होता. जिल्ह्यात डेंग्यू, चिकन गुनियाचे रुग्ण वाढत असल्याचे लक्षात येताच राज्यस्तरीय चमूने भेट देऊन आढावा घेतला.

# राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंटला एडुस्किल कनेक्ट २०२५ मध्ये राष्ट्रीय स्तरावरील तीन पुरस्कार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती –** शिमला येथे आयोजित एडुस्किल कनेक्ट २०२५ या राष्ट्रीय परिषदेत प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट (PRMCE-M²) ला तीन राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. हे महाविद्यालयासाठी अत्यंत गौरवाचे आणि अभिमानाचे क्षण ठरले.महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट कार्यरत अभियांत्रिकी महाविद्यालय २०२५, प्राचार्य उत्कृष्टता पुरस्कार प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांना, तसेच प्रशिक्षण व व्यवस्थापन अभ्यास विभागातील उत्कृष्टता पुरस्कार डॉ. शशिकांत थोरात यांना मिळाला. हे पुरस्कार अनुक्रमे प्रा. के.के. अग्रवाल, राघब दास आणि डॉ. सुभाजीत जगदेव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.या परिषदेत राज्यपाल श्री प्रताप शुक्ला, अभिनेता आशिष विद्यार्थी तसेच अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी सर्व प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. अन्य पदाधिकाऱ्यांनीही शुभेच्छा दिल्या. हे यश संस्थेच्या गुणवत्ता व निष्ठेचे प्रतीक आहे.

# महावितरण तिवसा उपविभागासमोर पुनःरचनेच्या विरोधात कृती समितीची द्वारसभा

## एम. पि. आर. ची सर्वांनूमते होळी



**विदर्भ प्रजासत्ताकदि.२४ तिवसा**
महावितरण मध्ये होऊ घातलेल्या पुनःरचनेच्या विरोधात महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते कृती समितीमध्ये सहभागी होऊन वितरण मध्ये होऊ घातलेल्या अधिकारी कर्मचारी यांच्या कार्यक्षेत्राचा तसेच कोणलाही विश्वासात न जनमित्रांसह अधीकारी वर्गाला वेठीस धरणारा पुनःरचनेच्या एम. पि. आर. ची सर्वांनूमते होळी केली. तसेच येणाऱ्या काळात जर ही पुनःरचना लागू झाली तर त्याचा जनतेला होणारा त्रास या बदल सर्वांना अवगत करण्यात आले. तसेच शासन दरबारी जर हा एम. पि. आर. रद्द झाला नाही तर कृती समितीने ठरवल्या प्रमाणे येत्या ९ आक्टों.२०२५ ला एक दिवस सर्व विज कर्मचारी अधिकारी संपावर जाईल असेही सांगितले. यामध्ये महाराष्ट्र राज्य स्टेट इले. वर्कर्स फेडरेशन, महा. राज्य विज कामगार संघटना, सबआर्डीनेट इंजिनिअर असो., महा. राज्य विज कामगार कॉंग्रेस, महा. राज्य मागा. विद्युत कर्मचारी संघटना, तांत्रिक कामगार युनियन (५०५९),महा.राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियन सह आदी संघटनांचे पदाधिकारी, अभियंते उपस्थित होते. यावेळी जोरदार घोषणाबाजी व नारे देऊन हेकेखोर शासनाचा विरोध करण्यात आला. याप्रसंगी विविध पदाधिकारी व कर्मचारी यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. व्दारसभेला श्री. निलेशजी उईके उप. अभि. तिवसा उपविभाग, श्रिकांत संत, प्रमोद इंगळे, राठोड, आडे, अभिजित केचे, रामदास चव्हाण, चेतन भगत सचीन रुंदे, बोंडे, सूरज अळणे, सचीन गौरखेडे, राहूल धोटे, मसराम, सोळंके, सलीम शहा, निलेश कडव, ठवकर, रोहीणी उमप, कडू, इंगळे सह समस्त अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# संत्रा उत्पादक यांना नुकसान भरपाईसाठी तिवसा तहसीलदारांना निवेदन

## ..शेतकरी न्याय हक्क विचार मंचची मागणी



विदर्भ प्रजासत्ताकदि.२४ तिवसा १३तिवसा तालुक्यात संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे प्रचंड नुकसान झाले असून, शासनाकडून तात्काळ मदतीची मागणी करण्यात आली आहे. संत्रा उत्पादक शेतकरी न्याय हक्क विचार मंच, तिवसा तालुका यांच्या वतीने दिनांक २३ सप्टेंबर रोजी तहसीलदार डॉ. मयुर कळसे यांना याबाबत निवेदन देण्यात आले.जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर या तीन महिन्यांत झालेल्या सततच्या पावसामुळे संत्र्याची झाडे व फळे मोठ्या प्रमाणात बाधित झाली आहेत. वारंवार निवेदन देऊनही अद्याप शेतकऱ्यांना नुकसानभरपाई जाहीर झालेली नाही. यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला असून, पंधरा दिवसांत ठोस निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा विचार मंचाने दिला आहे.यामध्ये नुकसानग्रस्त संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी, सोयाबीन पिकावर मोझॅक रोगामुळे झालेले मोठे नुकसान लक्षात घेऊन हेक्टरी ३० हजार रुपये मदत द्यावी. कपाशी व तुरीसह खरीप हंगामातील अन्य पिकांच्या नुकसानीसाठी हेक्टरी ४० हजार रुपये मदत द्यावी.यावेळी विचार मंचाचे प्रमुख दिनेश वानखडे यांच्या उपस्थितीत सोपान जीरापुरे, जयकुमार बोके, सुरेश जाधव, महेश लांजेवार, शिवहरी बोकडे, शरद तालन, नंदकिशोर जिरापुरे, संजीव मोरे, वासुदेव पुनसे आदी शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आशा वर्करच्या न्यायासाठी वंचित बहुजन आघाडी आक्रमक

## सागर भवतेंच्या नेतृत्वात लवकरच होणार तीव्र आंदोलन




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४तिवसा** तालुक्यातील तळेगाव ठाकूर येथील आशा वर्कर असलेल्या कामिनीताई कांबळे यांचे मानधन गेल्या ३ वर्षांपासून रोखण्यात आल्याचा आरोप करत वांचीत बहुजन युवा आघाडीचे जिल्हा महासचिव सागर भवते यांनी आक्रमक पवित्रा घेत तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयात धडक दिली. आशा वर्कर असलेल्या कामिनीताई कांबळे या ग्रामपंचायत सदस्य असताना त्यांनी ग्रा. प. सदस्यत्वचा राजीनामा दिला असताना ग्रा.प.चे कुठलेही मानधन त्यांनी स्वीकारले नाही तरी विविध नियमाचा दाखला देत तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाने सौ. कांबळे यांचे मानधन रोखत त्यांना घरचा रस्ता दाखवला आहे. सौ. कांबळे यांनी वारंवार संबंधित कार्यलयाकडे पाठपुरावा करत असताना मानधन घेणार नाही असे लिहून मागितले असल्याची तक्रार वंचित बहुजन आघाडी कडे केली असता जिल्हा महासचिव सागर भवते यांनी आक्रमक पवित्रा घेत संबंधित कर्मचाऱ्यांना धारेवर धरले. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी गैरहजर होते. तेव्हा २ दिवसांचा अल्टीमेटम तालुका आरोग्य यंत्रणेला देण्यात आला. मागासवर्गीय समूहातील आशा वर्कर यांच्यावर अन्यायाची भूमिका तालुका आरोग्य अधिकारी घेत आहे. सदर प्रकरण तात्काळ मार्गी न लावल्यास लवकरच वंचित स्टाईल ने आंदोलन छेडण्याचा इशारा सागर भवते यांनी दिला.यावेळी कामिनीताई कांबळे, मुकेश कांबळे, जिल्हा सदस्य प्रमोद मुंद्रे, सागर गोपाळे, विनोद खाकसे, नितीन थोरात, उपस्थित होते.

# लालपरीने घ्या देवदर्शन व पर्यटनाचा लाभ ! अभिनव पर्यटन व देवदर्शनासाठी पॅकेज टुर

## शारदिय नवरात्रोत्सव जागर महिला पर्यटनाचा चिखलदरा, शेगांव, माहूर, कळंब, शिर्डी त्र्यंबकेश्वर, तुळजापूर, पंढरपूर, अक्कलकोट स्पेशल बसेसची सुविधा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती –** 'प्रवाशांच्या सेवेसाठी' हे ब्रीद वाक्य घेऊन अहोरात्र सेवा देणाऱ्या लालपरी अर्थात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने अभिनव पर्यटन व देवदर्शना करीता पॅकेज टुरचे नियोजन अमरावती विभागा मार्फत करण्यात आले आहे. या पॅकेज टुर अंतर्गत जिल्ह्यातील प्रवाशाकडून त्यांचे समूहासाठी चिखलदरा, शेगांव, माहूर, कळंब, शिर्डी त्र्यंबकेश्वर, तुळजापूर, पंढरपूर, अक्कलकोट इत्यादी ठिकाणाकरीता बसेस नियोजित करण्यात आल्या आहेत.सार्वजनिक सुट्टीचे दिवशी व रविवार काही ग्रामीण विद्यार्थी फेऱ्या बंद राहतात, पर्यायाने प्रत्येक आगारात ३ ते ४ बसेस हया उपलब्ध असतात. सदरच्या बसेसद्वारे पर्यटन व देवदर्शन पॅकेज टुर ऑपरेट करणे शक्य असते. जिल्ह्यातील प्रवाशाकडून त्यांचे समूहासाठी चिखलदरा, शेगांव, माहूर, कळंब, शिर्डी त्र्यंबकेश्वर, तुळजापूर, पंढरपूर, अक्कलकोट



इत्यादी ठिकाणाकरीता बसेसची मागणी होत होती. प्रवाशांची ही प्रवास निकट बघता या अभिनव उपक्रमाला माहे जुलै २०२५ पासून अमरावती विभागात सुरुवात करण्यात आली. जुलै २०२५ ला १० ऑगस्ट २०२५ ला २५ व माहे सप्टेंबर २०२५ (०१ ते २० पर्यंत) ३२ टुर पॅकेज विभागाद्वारे चालविण्यात आले व महामंडळाच्या उत्पन्नात सुध्दा भर पडली ही बाब लक्षांत घेता विभागीय कार्यालयाद्वारे प्रवाशांकरिता शारदिय नवरात्राचे औचित्य साधून देवदर्शन पॅकेज, महिला पर्यटना या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.जर एखाद्या गावातील किमान ४० प्रवाशांच्या समुहाने मागणी केली तर त्यांचे गावाचे ठिकाणापासून ते त्यांच्या पर्यटन /देवदर्शन स्थळापर्यंत व तेथे प्रवाशांना पुरेसा वेळ देवून त्यांना पसंतीच्या ठिकाणापर्यंत सुरक्षित प्रवासाची ही योजना आहे. प्रवास माफक तिकीट व प्रवाशांना सर्व सवलतीचा लाभ सुध्दा (महिला सर योजना ५०% जेष्ठ नागरिक ५०%, अमृत जेष्ठ नागरिक १००% योजनेत दिला जातो. त्याचप्रमाणे मागील ३ महिन्यात जिल्हयात एकूण नवीन लालपरी दाखल झालेल्या असून प्राधान्याने या दूर पॅकेजवर दि जातात. ऐसपैस जागा, साथी स्वच्छ बस आरामदायी आसन व्यवम सुरक्षित व माफक प्रवास याद्वारे सदरची योजना पर्यटक / भाविकां

### महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे नियोजन

पसंतीला खरी उतरत आहे. अमरावती जिल्हयात अंबादेवी व एकरि देवीचे अनन्य साधारण महत्व आहे. याकरिता अमरावती पासूनलांब असणारे तालुके जसे दर्यापूर, परतवाडा, धारणी, चिखलदरा, अंजनग सुर्जी, वरूड येथून जर महिला समुह वर्गाची दर्शन बसची मागणी झाल्य सदर दिवशी समुहास त्यांच्या इच्छित स्थळापासून दुपारी निघुन सायंका ०६.०० वाजेपर्यंत अमरावतीला आणण्यात येईल व ४ ते ५ तास ही अमरावती आगाराला थांबून परतीला महिला समुहाला सुरक्षित घडवेल. ब-याचदा गुरुवार दिवशी श्री संत गजानन भक्तांद्वारे शेगांव करी बसची मागणी असते तर ही मागणी सुध्दा ॲडव्हांस बुकींग करुन समुह इच्छित स्थळापासून शेगांव पर्यंत नेऊन व तेथे ४ ते ५ तास दर्शन वेळ देऊ परतीला आणण्याची व एकाच दिवसात शेगांव दर्शनाकरीता महामंड सज्ज आहे. अप्रतिम निसर्ग सौंदर्य असणाऱ्या चिखलदरा येथे सु समुहाने मागणी केली तर ती सुध्या प्रवास घडवण्याची महामंडळाची योजना आहे. काही भाविकांना तुळजापूर अक्कलकोट / पंढरपूर अर्था अष्टविनायक दर्शनाचे सुध्दा नियोजन करायचे असेल तर त्यांचेकरी नियोजन करण्यात येईल. महामंडळाच्या या अभिनव उपक्रमाला अमरावती जिल्हयातील नागरिक भरघोस प्रतिसाद देऊन त्यांच्या हक्काच लालपरीचे आर्थिक बळकटीकरिता हातभार नक्की लागेल अशी विभागनियंत्रक श्री. निलेश बेलसरे यांनी व्यक्त केली.

# मध्यरात्री चोरीचा थरार पेट्रोलपंप वरून ट्रक चोरी

## नांदगाव पेठ येथील नाफडे पेट्रोल पंपवरील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४नांदगाव पेठ**



राष्ट्रीय महामार्गावरील टोल नाक्याजवळ असलेल्या नाफडे पेट्रोल पंप येथुन अज्ञात चोरट्यांनी ट्रक चोरून नेल्याची घटना २२ सप्टेंबरच्या मध्यरात्री घडली.या घटनेने एकच खळबळ उडाली असून ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेचे सविस्तर वृत्त असे की,शिराळा येथील रहिवासी रणजित साहेबराव बोकसे (वय ४०) यांच्या मालकीचा टाटा कंपनीचा ट्रक क्र. एम. एच.२७,डी.आर.२५२५ दि.२१ सप्टेंबर रोजी ल नांदगाव पेठ टोल नाका येथील एच.पी. नाफडे पेट्रोल पंपासमोर त्यांच्या चालकाने उभा करून ते आपल्या घरी निघून गेले होता.२३ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० वाजता मालक स्वतः पेट्रोलपंप जवळ पोहोचले असता ट्रक गायब असल्याचे निदर्शनास आले. अर्जदाराने तात्काळ जीपीएस लोकेशन तपासले असता ट्रक डवरगाव ते चिचखेड परिसरात हलविण्यात आल्याचे दिसून आले.रणजित बोकसे यांनी स्वतः जीपीएस लोकेशन द्वारे शोधाशोध केली मात्र ट्रक आढळून आला नाही.सदर ट्रक हा बँकेकडून फायनान्सवर घेतलेला असल्यामुळे त्यांनी बँकेकडे सुद्धा विचारणा केली मात्र बँकेने सुद्धा तो ट्रक जप्त केला नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे रणजित बोकसे यांनी तातडीने नांदगाव पेठ पोलीस स्टेशन गाठून ट्रक चोरीची तक्रार दाखल केली.पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे. अचानक झालेल्या ट्रकचोरीमुळे फिर्यादीच्या कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले आहे. या घटनेमुळे संपूर्ण ट्रान्सपोर्ट व्यवसायात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेत कुण्या व्यक्तीचा सहभाग आहे की कोणती टोळी या भागात सक्रिय आहे याचा तपास पोलीस यंत्रणा करत आहे.

# चोरीस गेलेली झायलो कार आरोपीसह जप्त; गाडगेनगर पोलिसांची कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

गाडगेनगर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या झायलो कार चोरी प्रकरणाचा तपास डीबी पथकाने अल्पावधीत उघडकीस आणला. या कारवाईत आरोपीला ताब्यात घेत चोरी गेलेली गाडी जप्त करण्यात आली आहे.फिर्यादी प्रवीण सुभाषराव निस्ताने (वय ४९, रा. धामणगाव ह.मु. केवल कॉलनी, अमरावती) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या मालकीची महिंद्रा कंपनीची झायलो कार (MH-43-BA-1009, किंमत सुमारे १,३०,०००) घरासमोर उभी केली होती. १६ सप्टेंबर रोजी ते कुटुंबासह बाहेरगावी गेले होते. १९ सप्टेंबर रोजी घरी परतल्यावर गाडी चोरीस गेल्याचे लक्षात आले. त्यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिस ठाण्यात कलम ३०५ (ब), भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल केला. तपासादरम्यान डीबी पथकाने आरोपी शेख शोयब शेख जाकीर (वय ३४, रा. जमीन कॉलनी, सेवादन नगर, अमरावती) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरी गेलेली झायलो कार जप्त करण्यात आली.ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल वर, पोनि (क्राईम) विजया पंधर यांच्या देखरेखीखाली सपोनि मनोजकुमार मानकर, डीबी इनचार्ज प्रकाश मिसाळ, नापोकाँ आशिष ठाकरे, नितीन कामडी, पोकाँ मंगेश मुलनकर, धनराज कुमरे व मतीन शेख यांनी संयुक्तरीत्या केली.

# धामणगांव रेल्वे परिसरात मंगलामुखी किन्नर नवदुर्गा मंडळाचा पहिला शारदीय नवरात्री उत्सव उत्साहात सुरू

## भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून देवीचे दर्शन घेण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

धामणगांव रेल्वे -दत्तापूर येथील मंगलामुखी किन्नर नवदुर्गा मंडळाच्या वतीने शारदीय नवरात्री उत्सव प्रथमच मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवात देवीची आराधना, धार्मिक कार्यक्रम, कीर्तन, भजन, आरत्या यांचा उत्सवमय माहोल अनुभवायला मिळत आहे. परिसरात दररोज सकाळ-संध्याकाळ आरतीच्या गजराने भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले आहे.मंडळाच्या स्थापनेचे हे पहिलेच वर्ष असून किन्नर समाजातील सदस्यांनी एकत्र येऊन हा उपक्रम राबवला आहे. यामध्ये समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग दिसून येत आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने मंडळाने आकर्षक देवी मंडप, प्रकाश व्यवस्था व सजावटीची विशेष व्यवस्था केली आहे. विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांद्वारे भक्तांना नवरात्रीचा खरा आनंद मिळावा, यासाठी मंडळ कार्यरत आहे.




भक्तांना सुलभ दर्शन व्यवस्था करून दिली असून परिसरातील श्रद्धाळूंना मोठ्या संख्येने उपस्थित राहून देवीचे दर्शन घेण्याचे आवाहन मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.मंडळाच्या वतीने सांगण्यात आले की, आम्ही प्रथमच हा उत्सव आयोजित करत आहोत. किन्नर समाजाने समाजासाठी एक वेगळा उपक्रम हाती घेतला आहे. भक्तांनी दर्शनासाठी येऊन या उपक्रमाला प्रोत्साहन द्यावे, हाच आमचा हेतू आहे.धामणगाव रेल्वे व परिसरात या उत्सवाला विशेष प्रतिसाद मिळत असून नवरात्रोत्सवाला भक्तिमय वातावरण लाभले आहे.

# अरूणाचल प्रदेशात फुलपाखरांचे सर्वेक्षण

## अमरावतीमधून ३ निसर्ग प्रेमींची निवड

## अलोक ठाकरे, नील माहेश्वरी, धारणीच्या रोहित पाल यांना संधी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४धारणी**



देशाच्या पूर्वोत्तर भागाच्या सिमांतर प्रहरी असलेल्या अरुणाचल प्रदेशातील टॅलीवॅली अभयारण्यात फुलपाखरू सर्वेक्षणासाठी अमरावती जिल्ह्यातून तीन निसर्ग प्रेमी युवकांची निवड करण्यात आली आहे. रोहित पाल हे धारणीचे रहिवाशी असल्याने त्याचे सर्व स्तरावर अभिनंदन होत आहे.

अरूणाचल राज्याच्या टॅली नावाच्या अभयारण्यात चंदा फुलपाखरूसंशोधन प्रभावित असून यासाठी अमरावतीचे समोर ठाकरे, नील माहेश्वरीसह धारणीच्या भोकरबर्डी येथील उपसरपंच रोहित पाल यांना संधी उपलब्ध झाल्याने त्यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अमरावती जिल्ह्यातील मेळघाटात या तिन्ही युवकांनी निसर्गासह वन्यप्राणी, पक्ष वनस्पती आणि गवताच्या विभीन्न प्रजातींचे अध्ययन केलेले आहे. या शिवाय राज्यात सर्वात जास्त रंगबेरंगी फुलपाखरू मेळघाटात असून यातिघांनी वेळ व पैसा खर्च करून अभ्यास केला असल्याने अमोल, नील आणि रोहित यांच्या अभ्यास पथकात समाविष्ट करण्यात आलेले आहे. अमोल ठाकरे छायाचित्रकार असून जैवविविधतेचे गाढे अभ्यासक म्हणून नीलची ख्याती आहे. धारणीचे रोहित पाल हे पर्यावरण संवर्धनसाठी समाजात नेहमी जनजागृती करत असतात. त्यांच्या परसबागेत शेकडो प्रजातीच्या दुर्मिळ वनस्पतींची झाडेआहेत. या विषयी आमचे प्रतिनिधी रविनवलाखे यांनी रोहितसह तिघांचे -अभिनंदन केले. राष्ट्रीयस्तरावर फुलपाखरूंच्या सर्व्हे क्षणासाठी अमरावती जिल्ह्यातून तीन युवकांना निवडण्यात आल्याचे समाधान तिघांनी व्यक्त केले. या संधीचा अभ्यासाचा उपयोग मेळघाटातील दूर्मिळ फुलपाखरूंच्या अभ्यास करण्यासाठी आम्ही करणार अशी प्रतिक्रीया रोहित पाल यांनी व्यक्त करताना शुभेच्छा स्विकारल्या. अमरावतीसाठी ही अभिमानाची बाब आहे.

# आई अंबेच्या गोंधाळात गूंजले श्रद्धेचे सूर

## अमोल पाचपोर यांचा भक्तिभावाने परिपूर्ण जागर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४भातकुली**

ऐतिहासिक परंपरेचा अमुल्य ठेवा असलेल्या महाराष्ट्रात आजही काही परंपरा अगदी जशाच्या तशा जोपासल्या जातात, त्यातील च एक परंपरा म्हणजे आदिशक्ती चा गोंधळ होय,आसरा अमरावती येथील प्रसिद्ध गोंधळी श्री अमोल सहदेव पाचपोर यांनी पारंपारिक देविचा गोंधळ सादर करण्याची परंपरा अजुन ही कायम ठेवली आहे नवरात्राचे गोंधळ, चैत्राचे गोंधळ,असो वा लग्नकार्यात किंवा कार्य उरकल्या नंतर प्राचिन काळी गोंधळ जागरणाची प्रथा होती ती प्रथा काळाच्या ओघात कमी पडली असली तरी नाम शेष झाली नाहीआज ही अनेक कुटुंबात व परीवारात नवरात्रात व लग्नकार्यात ही परंपरा जोपासली जातेहिंदू धर्मात कुलदैवत असलेल्या आई भवानीचा कुळाचार म्हणून गोंधळ जागरण केल्या जातात यावेळी चौरंगावर नवशक्ती कोटी देवता योगीणी अष्टविनायक नवग्रह राशी व मातृत्व दैवत यांना अधोरेखित करणारा धान्याचा घट मांडल्या जातो त्यानंतर आई तुळजाभवानी जेजुरीचा खंडोबा यांचे आवाहन करुन देविच्या गोंधळाचा जयघोष होतो,सदा आनंदी अंबा बाईचा उदो उदो,,,, करुन गोंधळाला सुरुवात होते अशी माहिती दिली

# मध्यरात्री आठ तास बत्तीगुल झाल्याने रोष

## अधिकारी फोन उचलेना; मुक्कामी वायरमन नाही : मच्छरांमुळे नागरिक त्रस्त




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४टाकरखेडा संभू :**

येथे मध्यरात्री ३.१० वाजता अचानक विज पुरवठा खंडित झाला तो सकाळी ११.३० पुर्ववत झाला. तब्बल आठ तास गावातील बत्तीगुल झाल्याने नागरिकांनी चांगलाच रोष व्यक्त केला. या दरम्यान अधिकाऱ्यांनी फोन उचलले नाही तर येथे मुक्कामी वायरमन नसल्याने विज पुरवठा दुरुस्त होऊ शकला नाही.सद्या नवरात्र उत्सवाचे दिवस सुरू असल्याने गावात देखील अनेक मंडळांमध्ये दुर्गादेवी उत्सव आयोजित केला आहे.

अशातच येथे वीज पुरवठा रोजच खंडित होतअसून नागरिकांच्या संतापाला ऊत आला आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक लाईन बंद केल्या जात आहेत. लाईन कशामुळे बंद झाली याची माहिती मिळत नाही, तर अधिकाऱ्यांचे फोन उचलले जात नाहीत. रात्री फोन केला असता मोबाईल बंद असतात किंवा कोणी प्रतिसाद देत नाही. गावात मुक्कामी वायरमन राहत नसल्याने दुरुस्तीला विलंब होत आहे. त्यामुळे नागरिक, महिला व लहान मुले अंधारात मच्छरांच्या त्रासामुळे हैराण झाले आहेत. सोमवारी देवीचा पहिला दिवस असूनही रात्रीपासून वीज पुरवठा खंडित त्रापासून राहिल्याने गावकऱ्यांची मोठी गैरसोय झाली. गावकऱ्यांचा संताप अनावर झाला असून, महावितरणच्या अशा ढिसाळ कारभाराविरोधात तात्काळ कार्यवाही न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# महिलांनी आरोग्य शिबीरातील सेवेचा लाभ घ्यावा - जिल्हाधिकारी आशिष येरेकर

## 'जागर महिला आरोग्याचा'चे उद्घाटन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती,**

अहिल्यादेवी होळकर यांच्या तिनशेव्या जयंतीनिमित्त जिल्हा प्रशानातर्फे विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. नवरात्रोत्सवात महिलांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन आणि तपासणी शिबीर घेण्यात येत आहे. या आरोग्य शिबीराचा लाभ महिलांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

जिल्हा नियोजन सभागृहात आजपासून जागर महिला आरोग्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दाणेज, उपजिल्हाधिकारी श्रद्धा उदावंत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बयास, माविमचे डॉ. रंजन वानखेडे, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, जिल्हा खनिकर्म अधिकारी प्रणिता चाफले, मार्गदर्शक डॉ. भावना सोनटक्के, डॉ. नेहा देशमुख आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले, जिल्ह्यातील मेळघाटात आजही बालके आणि महिलांच्या आरोग्याचा प्रश्न आहे. बालमृत्यूबाबत गेल्या कालावधीत चांगले कार्य झाल्याने यावर नियंत्रण मिळविण्यात यश मिळविले आहे. मात्र मातामृत्यूबाबत अद्यापही काळजी घेणे आवश्यक आहे. मातामृत्यू आणि बालमृत्यू रोखण्यासाठी मेळघाट परिक्रमा उपक्रम राबविण्यात येत आहे. यात तज्ज्ञ डॉक्टरांचे शिबीर आयोजित करण्यात येत आहे. यामुळे अतिजोखमीच्या माता आणि बालकांची माहिती होण्यास मदत मिळेल.

जिल्हा प्रशासनातर्फे वर्षभर उपक्रम राबविण्यात येणार आहे. यातील नवरात्रोत्सवात महिलांची आरोग्य तपासणी हा महत्वाचा उपक्रम आहे. तसेच याठिकाणी महिलांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. जीवनशैलीतील बदलामुळे शहरी आणि ग्रामीण भागात कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. वेळीच निदान आणि उपचारामुळे हा आजार बरा होणे शक्य आहे. याठिकाणी घ्यावयाची काळजी याबाबतही मार्गर्शन होणार आहे. उत्तम वक्ते उपलब्ध होणार असल्याने महिलांनी शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या संकल्पनेतून जागर महिला आरोग्याचा उपक्रम तयार आहे. यात महिलांची संपूर्ण तपासणी करण्यात येणार आहे. तसेच महिलांच्या कर्करोगाबाबत तपासणी करण्यासाठी मेमोग्राफी वाहन उपलब्ध करण्यात आले आहे. महिलांनी आरोग्य तपासणी करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात अकरावीच्या १३ हजार जागा अद्याप रिक्तच

## आज गुणवत्ता यादी जाहीर होणार प्रवेशाकरिता शेवटची संधी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

जिल्ह्यात अकरावी प्रवेशासाठी अर्ज भरलेले अनेक विद्यार्थी अद्यापही प्रवेशाच्या प्रतीक्षेत आहेत. या विद्यार्थ्यांना २२ ते २५ सप्टेंबर या कालावधीत होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेतून अंतिम संधी मिळेल. यात फेब्रुवारी-मार्च परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या, परंतु जुलैमधील फेरपरीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचाही समावेश आहे. जिल्ह्यात विविध कनिष्ठ महाविद्यालयात १३ हजार ६४ जागा रिक्त आहेत. अशी माहिती अकरावी प्रवेशप्रक्रिया समन्वयक प्रा. अरविंद मंगळे यांनी दिली.

यंदा जिल्ह्यात ३७ ते ३८ हजार विद्यार्थ्यांनी अकरावी प्रवेशासाठी नोंदणी केली होती. त्यापैकी ३० हजारांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा भाग एक आणि भाग दोन पूर्ण भरून आपले अर्ज निश्चित केले. अकरावीच्या विविध प्रवेश फेऱ्यांनंतर आता एकूण २९ हजार ११६ विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रवेश विविध कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये निश्चित केले आहेत. जिल्ह्यात १३ हजार ६४ जागा रिक्त आहे. आता या अंतिम फेरीसाठी कनिष्ठ महाविद्यालयांमधील



रिक्त जागा जाहीर करणे, कोट्याच्या जागा जाहीर करणे, प्रवेशक्षमता वाढवणे आदी प्रक्रिया २२ सप्टेंबर रोजी करण्यात आल्या. २२ आणि २३ सप्टेंबरला नवीन विद्यार्थी नोंदणी, अर्जाच्या भाग १ मध्ये दुरुस्ती करणे, प्राधान्यक्रम देणे, आदी गोष्टींसाठी मुदत देण्यात आली. ज्या महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे, ती महाविद्यालये २४ आणि २५ सप्टेंबर या दोन दिवसांत संबंधित विद्यार्थ्यांशी संपर्क साधून त्यांना प्रवेशासाठी बोलावतील. २५ सप्टेंबर ही प्रवेशाची अंतिम मुदत असेल. या मुदतीनंतर विद्यार्थ्यांना पुढील संधी उपलब्ध करून दिली जाणार नाही, असे संचालनालयाने जाहीर केले आहे.

# कृषी आणि महसूल विभागाचे कर्मचारी प्रत्यक्ष शेतावर जाऊन पंचनामे करतील; कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मुंबई**

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी एक महत्त्वाची घोषणा केली आहे. शेतकऱ्यांनी स्वतः नुकसानीचे फोटो काढून पाठविण्याची गरज नाही. कृषी आणि महसूल विभागाचे कर्मचारी प्रत्यक्ष शेतावर जाऊन पंचनामे करतील. यामुळे शेतकऱ्यांची अनावश्यक धावपळ कमी होईल.

या संदर्भात भरणे यांनी सांगितले की, पंचनामे युद्धपातळीवर सुरू असून प्रत्येक जिल्ह्यात अधिकारी व कर्मचारी शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले आहेत. जालनामध्ये तब्बल २ लाख ५४ हजार एकर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले आहे. नांदेडमध्ये तर सर्वाधिक हानी झाली आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री स्वतः या भागांची पाहणी करून शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली असून पिके उध्वस्त झाली आहेत. अशा पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देणारे निर्णय घेतले आहेत.



कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी छत्रपती संभाजीनगर येथे बोलताना स्पष्ट केले की, ज्या भागात पावसामुळे नुकसान झाले आहे, त्या भागातील शेतकऱ्यांकडून कर्जवसुली थांबवली जाईल. त्यासाठी बँकांना तशा सूचना देण्यात येतील. याशिवाय नुकसानीची भरपाई तातडीने शेतकऱ्यांच्या हाती येण्यासाठी प्रक्रिया जलदगतीने सुरू आहे. दिवाळीच्या आधी कोणत्याही शेतकऱ्याला मदत मिळण्यात विलंब होणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

**शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी दिलासा मिळेल**

राज्यातील पूरपरिस्थिती गंभीर बनल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी २२१५ कोटी रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली आहे. आतापर्यंत ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना ही मदत निश्चित करण्यात आली असून पुढील आठ ते दहा दिवसांत ही रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होईल. स्थानिक प्रशासनाला यासंबंधी स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. नुकसानीच्या निकषांमध्ये शिथिलता आणून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना मदतीचा लाभ मिळावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी दिलासा मिळेल, अशी अपेक्षा आहे.

**नोंद करण्याचे काम सुरू**

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे हे स्वतः पूरग्रस्त भागांची पाहणी करून नुकसानीचे प्रमाण तपासत आहेत. मुख्यमंत्री फडणवीस देखील अनेक भागांना भेट देणार असून शेतकऱ्यांना तातडीची मदत पोहोचवली जावी, यासाठी त्यांनी सर्व यंत्रणांना सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत. जिल्हा प्रशासन सध्या युद्धपातळीवर काम करत असून, पंचनामे, विस्थापितांसाठी निवारा शिबिरे, अन्नधान्य व पाणी पुरवठा, तसेच जनावरांच्या हानीची नोंद करण्याचे काम सुरू आहे. अधिकारी व कर्मचारी दिवसरात्र मेहनत करून शेतकऱ्यांपर्यंत शासनाच्या मदतीचा लाभ पोहोचवत आहेत.

# अजनी, नागपूर आणि कामठी रेल्वे स्थानकावर राहणार कडेकोट बंदोबस्त

## धम्मचक्र प्रवर्तन दिनाची 'अशी' आहे तयारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नागपूर**



धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या देश विदेशातील अनुयायांची होणारी प्रचंड गर्दी लक्षात घेता अजनी, नागपूर आणि कामठी रेल्वे स्थानकावर कडेकोट बंदोबस्त लावला जाणार आहे. त्यासाठी रेल्वे पोलीस आणि रेल्वे सुरक्षा दलाच्या अधिकाऱ्यांनी नियोजन चालविले आहे.

दसरा तसेच धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या देश विदेशातील अनुयायांची दीक्षाभूमी तसेच कामठीच्या ड्रॅगन पॅलेस मध्ये गर्दी होते. विचारांचे सोने लुटण्यासाठी येणारे बाबांचे अनुयायी मुख्यत्वे अजनी रेल्वे स्टेशन, नागपूरचे मुख्य रेल्वे स्टेशन तसेच कामठी रेल्वे स्थानकावरून येणे जाणे करतात. ते लक्षात घेऊन या तीनही रेल्वे स्थानकांवर तसेच बाहेरच्या परिसरात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त लावला जाणार आहे. त्यासाठी रेल्वेचे पोलीस (जीआरपी) अधीक्षक मंगेश शिंदे यांनी रेल्वे सुरक्षा दलाचे (आरपीएफ) अधिकारी तसेच नागपूर शहर पोलिसांच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधने सुरू केले आहे.

**सोमवार पासून बंदोबस्त**

सोमवारी २९ सप्टेंबर पासून या तिन्ही रेल्वे स्थानकांवर बंदोबस्त लावला जाणार असून जीआरपी तसेच आरपीएफच्या सोबतीला रेल्वे कर्मचारी राहणार आहेत. तीनही रेल्वे स्थानकावर बॉम्बशोधक आणि नाशक पथक देखील तैनात राहतील. गर्दीत कोणती गडबड होऊ नये यासाठी साध्या देशातील पोलिस आणि आरपीएफचे जवानही लक्ष ठेवून राहणार आहेत.

**जीआरपी. आरपीएफच्या सुट्या रद्द**

रेल्वे स्थानकावर होणारी प्रचंड गर्दी लक्षात घेता रेल्वे पोलीस (जीआरपी) तसेच रेल्वे सुरक्षा दलातील (आरपीएफ) जवानांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आले आहेत. याशिवाय मुख्यालयातून अतिरिक्त मनुष्यबळ मागवून नमूद रेल्वे स्थानकांवरील पोलीस बंदोबस्तात लावला जाणार आहे.

**आज होणार संयुक्त बैठक**

या संबंधाने बंदोबस्ताचे नियोजन करण्यासाठी रेल्वे पोलीस अधीक्षक कार्यालयात जीआरपी,आरपीएफ तसेच शहर पोलीस अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत सुरक्षेच्या संबंधाने काय काय उपाययोजना करायच्या त्यावर मंथन केले जाणार आहे.

# पुढील चार दिवस विदर्भात वारे, विजांसह मुसळधार पावसाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नागपूर**

**बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा**

महाराष्ट्रात सध्या पुराने थैमान घातले आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे पुढील तीन ते चार दिवस विदर्भात काही ठिकाणी मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता असल्याचे प्रादेशिक हवामान खात्याने सांगितले आहे.

या काळात विदर्भातील तापमान आणखी कमी होणार आहे. पूर्व विदर्भातील काही ठिकाणी मुसळधार पाऊस आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्याचेही हवामान खात्याने सांगितले आहे.

तर यवतमाळ, गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये वादळी वारे आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असून, आगामी तीन ते चार दिवस हवामान अस्थिर राहणार आहे. दरम्यान नागपूरसाठी पुढील दोन दिवसांसाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे, असे प्रादेशिक हवामान खाते, नागपूरचे शास्त्रज्ञ प्रवीण कुमार यांनी सांगितले आहे.

# श्री संत चापालाल महाराज संस्थान येथे साकारणार पंचवीस लक्ष रुपयांचे सभागृह

## मा. खासदार सौ नवनीतजी राणा यांचे संस्थानने मानले आभार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४तिवसा**



संपूर्ण बंजारा समाजाचे दैवत असलेल्या नांदुरा येथील संत चाफालाल महाराज संस्थान येथे दरवर्षी मोठ्या प्रमाणात महाशिवरात्री चे पंचमीला मोठा उत्सव त्या ठिकाणी साजरा केला जातो.बंजारा समाजातील संपूर्ण समाज बांधवांची जणू काशीच अशाप्रमाणे इथली आख्यायिका असताना या ठिकाणी लाखोच्या संख्येने बंजारा समाज बांधव व इतर चाफालाल महाराजांना मानणारा मोठा भक्त वर्ग त्या ठिकाणी दरवर्षी संत चरणी लिहीन होतो. व त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आपल्या पारंपारिक बोली भाषेत व संस्कृतीमध्ये विविध कार्यक्रम पार पडतात परंतु सदर कार्यक्रम करण्याकरिता त्या ठिकाणी पुरेसे सभागृह नसल्याकारणाने भाविक भक्तांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते याबाबत अमरावती जिल्ह्याच्या माजी खासदार सौ नवनीत राणा यांना संस्थान चे विश्वस्त मंडळींनी अवगत केले असता सौ नवनीत राणा यांनी प्रत्यक्ष कार्यक्रमादरम्यान त्या ठिकाणी भेट दिली व आपले तीर्थक्षेत्र विकास निधी मधून त्या ठिकाणी २५ लक्ष रुपयांचा निधी सभागृहाकरिता मंजूर करून दिला.

सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून लवकरच सदर कामाला सुरुवात होणार आहे तेव्हा त्याच अनुषंगाने चाफालाल महाराज संस्थानचे विश्वस्त मंडळींनी सौ नवनीत राणा यांची भेट घेऊन सभागृह उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले तसेच युवा स्वाभिमान पार्टीचे जिल्हा कार्याध्यक्ष धीरज केने यांचे विशेष पाठपुराव्याने सदर सभागृह त्या ठिकाणी मंजूर करण्यात आले त्यामुळे विश्वस्त मंडळींनी धीरज केने यांचे सुद्ध. त्या ठिकाणी आभार मानले.

सदर कामाचे अनुषंगाने सौ नवनीत राणा यांची भेट घेण्याकरिता गेले असता यावेळी संस्थांचे अध्यक्ष रमेशजी राठोड , सचिव जग्गूजी राठोड , पंडित राठोड , कलचंद राठोड , मांगीलाल राठोड, राजू चव्हाण , लच्चीराम पवार तसेच ज्यांचे विनंती वरून व विशेष पाठपुराव्याने सदर सभागृह त्या ठिकाणी मंजूर करण्यात आले ते बंडूभाऊ जाधव व दयाराम राठोड हे सुद्धा उपस्थित होते.

# शिवसेना (उबाठा) गट आक्रमक : कृषी अधीक्षकांच्या टेबलावर फेकले सोयाबीन वरून टाकले पाणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २४ अमरावती**

अमरावती जिल्ह्यात झालेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे १ लाख २३ हजार हेक्टरवरील शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याच पार्श्वभूमीवर ठाकरे गटाच्या वतीने जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयावर आज जोरदार आंदोलन करण्यात आले.

ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख पराग गुडधे आणि मनोज कडू यांच्या नेतृत्वाखाली शेकडो शिवसैनिकांनी कृषी अधीक्षक कार्यालयात धडक दिली. नुकसानग्रस्त सोयाबीन व कपाशीची उध्वस्त झालेली पिके थेट जिल्हा कृषी अधिकारी राहुल सातपुते यांच्या कार्यालयात नेऊन त्यांच्या टेबलावर ठेवण्यात आली. त्यानंतर त्या सोयाबीन वर पाणी टाकून पिकाची परिस्थिती सांगण्यात आली.या आंदोलनामुळे परिसरात काही काळ प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिस बंदोबस्तात आंदोलन शांततेत पार पडले, मात्र शेतकऱ्यांचा संताप स्पष्टपणे जाणवत होता.

**शिवसैनिकांनी शासनाकडे खालील प्रमुख मागण्या केल्या:**

संपूर्ण अमरावती जिल्ह्यात 'ओला दुष्काळ' जाहीर करावा

बंद केलेली एक रुपयातील पिक विमा योजना तातडीने पुन्हा सुरू करावी

दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत द्यावी

# आयटीआयमध्ये अल्पदरामध्ये प्रशिक्षण घ्या, रोजगार मिळावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २४ अमरावती**

मुक्त, बुवतींसाठी कौशल्यावर आधारित रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी देण्यासाठी शासनामार्फत २ ऑक्टोबरपर्यंत कौशल्य प्रशिक्षण देणार आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत युक्त-युवतींना रोबोटिक्स, सौरऊर्जा तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, व्यक्तिमत्त्व विकास यासारख्या आधुनिक विषयांवरील अल्पकालीन अभ्यासक्रम शिकवला जाणार आहेत. आयटीआयाच्या विद्यार्थ्यांना हे प्रशिक्षण मोफत मिळणार असून, अन्य इच्छुक युवक-युवतींनाही अल्पदरात अभ्यासक्रम शिकवण्याची संधी उपलब्ध होणार आहे. युवकांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी उद्देशाने आयटीआयमध्ये शॉर्ट टर्म हा उपक्रम पहिल्या टप्यात येथील संत गाडगेबाबा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत ८ पैकी ५ शॉर्ट टर्म कोर्सेस सुरू करण्याचे नियोजन केले. अल्पकालीन अभ्यासक्रमात प्रवेश घेण्यासाठी इच्छुकांना अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करावी. दरम्यान, स्वयंरोजगाराच्या दृष्टीने १७सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत कौशल्य रोजगार प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत नवीन विषयांचे अल्पकालीन अभ्यासक्रम शिकण्याची संधी

# पोल्ट्रीफार्मच्या मालकाने शेकडो मृत कोंबड्या फेकल्या तलावात

## डिगरगव्हाण तलावातील घटना : नागरिकांत संताप, माहुली जहागीर पोलिसांत गुन्हा दाखल

**मंगेश तायडे**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नांदगाव पेठ**

नजीकच्या डिगरगव्हाण येथील एका पोल्ट्रीफार्म संचालकांने फार्म मधील मृत झालेल्या शेकडो कोंबड्या गावातील तलावात फेकून दिल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. कुजलेल्या कोबड्यांच्या प्रचंड दुर्गंधीनंतर हा प्रकार उघडकीस आला असून डिगरगव्हाण येथील कर्तव्यदक्ष सरपंचा जिल्हेश्वरी शंकरराव ठाकरे यांच्या तक्रारीनंतर माहुली जहागीर पोलिसांनी त्या पोल्ट्रीफार्म संचालकावर गुन्हे दाखल केले.या प्रकारामुळे गावकऱ्यांच्या जीवितासमोर मोठा धोका उभा राहिला असून, परिसरात भीतीचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. डिगरगव्हाण येथील सरपंचा जिलेश्वरी ठाकरे यांनी माहुली पोलीस ठाण्यात यासंदर्भात दाखल केलेल्या तक्रारीनुसार आरोपी पांडुरंग माणिकराव कडू (वय ५८, रा. डिगरगव्हाण) यांचे डिगरगव्हाण येथे पोल्ट्रीफार्म असून १९ सप्टेंबर रोजी एका अज्ञात रोगामुळे त्यांच्या फार्म मधील शेकडो कोंबड्या अचानक मृत पावल्या.पोल्ट्रीफार्म चे संचालक पांडुरंग कडू यांनी कसलाही विचार न करता २० सप्टेंबर च्या मध्यरात्री सर्व मृत कोंबड्या



थेट गावातील तलावात टाकल्या. या कोंबड्या कुजलेल्या अवस्थेत असल्याने तलावातील पाणी दूषित झाले. या तलावाशेजारील विहिरीतून गावाला पाणीपुरवठा केला जात असल्याने हे दूषित पाणी थेट घराघरात पोहोचण्याचा धोका निर्माण झाला. प्रचंड दुर्गंधी वाढल्यामुळे नागरिकांनी दोन दिवसांपूर्वी त्याठिकाणी जाऊन बघितले तर तलावात असंख्य मृत कोंबड्या कुजलेल्या अवस्थेत आढळून आल्या. नागरिकांनी ही बाब सरपंच ठाकरे यांच्या लक्षात आणून दिली. सरपंच ठाकरे यांनी तातडीने तलावाची पाहणी करून माहुली जहागीर पोलिसांना घटनास्थळी पाचारण केले. सरपंच जिल्हेश्वरी ठाकरे यांच्या तक्रारीनुसार माहुली पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध बिएनएस च्या कलम २७९,२८०,२७२,१२५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे

**पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत घातक**

पाण्याच्या नैसर्गिक स्त्रोतांमध्ये अशा प्रकारे कुजलेले प्राणी टाकणे हा पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत गंभीर गुन्हा आहे. तलावातील पाण्यामुळे जमिनीतही दूषितपणा पसरण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. जर हे दूषित पाणी गावकऱ्यांच्या पिण्याच्या पाण्यात मिसळले असते, तर अनेक नागरिक थेट मृत्यूच्या विळख्यात सापडले असते, अशी भीती व्यक्त होत आहे.यावेळी पंचनामा करण्यासाठीजलसंधारण विभाग, आरोग्य विभाग , तलाठी, पोलीस पाटील, ग्रामसेवक, मंडळ अधिकारी आदींची उपस्थिती होती.

**पोल्ट्रीफार्मची ना हरकत रद्द करा- डॉ. शंकर ठाकरे**

गावाच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या या निर्लज्ज कृत्यामुळे गावात प्रचंड खळबळ उडाली असून, संबंधित आरोपीवर कठोर कारवाई करावी तसेच त्या पोल्ट्री फार्मची ना हरकत रद्द करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. शंकर ठाकरे यांनी केली आहे.

# अतिवृष्टीचे तडाखे: शेतकऱ्यांचे कष्ट पाण्यात

## हातातोंडाशी आलेले पीक अतिवृष्टीने हिरावले; बळीराजा संकटात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**



सोयाबीन कापणीचा हंगामात सतत पाऊस सुरू असल्याने कापणी व मळणी कशी करावी, असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे आहे. अशा परिस्थितीत शेतातील उभ्या सोयाबीनला कोंब फुटत असल्याने खरिपाचा हंगाम धोक्यात आल्याचे चित्र आहे.

काही दिवसांतच सोयाबीन कापून घरात येणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये उत्साह होता. सप्टेंबर महिन्यात सततच्या पावसाने शेतात तलाव साचले. पाण्याच्या निचऱ्याअभावी सोयाबीन पीक खराब होण्याच्या मार्गावर असून, तुरीचे पीक पिवळे तर कपाशीची परिस्थिती फारच वाईट झाली आहे.

आसेगावपूर्णा सह विरूळपूर्णा, दहीगावपूर्णा, धानोरापूर्णा, गोविंदपूर, राजनापूर्णा परिसरात सोयाबीनचा पेरा वाढला आहे. सुरुवातीपासून पाऊस चांगला बरसल्याने पीकसुद्धा चांगले बहरले. मात्र काही दिवसांपासून सततच्या पावसाने शेतातील उभ्या असलेल्या सोयाबीन पिकांच्या शेंगांमधून मधून अंकुर दिसून येत आहे.

**शासन मदतीसह पीक विमा परतावा मिळावा**

पावसाने सोयानीनचे पीक पिवळे पडून हातचे गेले आहे. काही ठिकाणी जागेवरच सडले तर कुठे शेगांना अंकुर निघत आहे. त्यामुळे शासन मदतीसह पीक विमा परतावा मिळावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

# नवरात्रीचे नवरंग...............

## नवरात्रीचा आजचा तिसरा दिवस; आजचा रंग निळा



नवरात्रीच्या मंगलक्षणी प्रकटलेले सौंदर्य, संस्कार आणि शक्ती महिला महाविद्यालयातील प्राध्यापिकांच्या समूहात स्त्रीरंगाचे दर्शन...


# अमरावती पोलीस आयुक्तालयात 'ग्रीन एनर्जी'चा वापर

## १०५ किलोवॅटच्या सौरऊर्जा प्रकल्पाच्या उभारणीतून ऊर्जाबचत व पर्यावरणपूरकतेचा मोठा लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती,**

ऊर्जा बचत आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी अमरावती पोलीस आयुक्तालय आणि कार्यालय परिसरात १०५ किलोवॅट क्षमतेचा सौर विद्युत प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. सुमारे ७२ लक्ष रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या या प्रकल्पामुळे पोलीस यंत्रणा आता पारंपरिक विजेवर कमी प्रमाणात अवलंबून राहणार आहे. यामुळे वीज खर्चात मोठी बचत होणार असून अमरावती पोलीस विभागाचा हा उपक्रम संपूर्ण राज्यासाठी एक आदर्श ठरला आहे.

या सौरऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून संपूर्ण आयुक्त कार्यालय व परिसराचे विद्युतीकरण करण्यात आले आहे. तसेच पोलीस परेड मैदान येथे ९ मीटर उंचीचे तीन एल.ई.डी. हायमास्ट दिवे देखील कार्यान्वित करण्यात आले असून, यामुळे रात्रीच्या वेळी आयुक्तालयाचा परिसर प्रकाशमान आणि सुरक्षित झाला आहे. या संपूर्ण प्रकल्पासाठी



जिल्हा नियोजन समिती योजनेतून रु. ७१.७६ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला. या प्रकल्पाच्या माध्यमातून सौर ऊर्जेचा वापरामुळे भविष्यात होणाऱ्या वीज खर्चात मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. पर्यावरणपूरक तंत्रज्ञान, हरित ऊर्जा आणि शाश्वत विकास याचे आदर्श उदाहरण म्हणून अमरावती पोलीस विभागाचा हा उपक्रम संपूर्ण राज्यासाठी प्रेरणादायी ठरणार आहे.या प्रकल्पाची एकूण क्षमता १०५ किलोवॅट असून पारेषण संलग्न सौर प्रकल्प प्रकारात हा मोडतो. जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त ७१.६१ लाख निधीतून हा प्रकल्प उभारण्यात आला असून सहा महिन्याचा कालावधी प्रकल्प पूर्ण होण्यासाठी लागला आहे.

या सौर प्रकल्पाच्या अंमलबजावणीनंतर पारंपरिक वीज खर्चात लक्षणीय घट झाली आहे. प्रकल्पापूर्वी आयुक्तालयाचा मासिक वीज खर्च १,०२,००० ते २,०७,००० पर्यंत होता. मात्र, सप्टेंबर २०२५ च्या वीज बिलात हा खर्च केवळ २९० इतका नोंदवला गेला आहे.

